



# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १०२ वा फोन २३०१०१ दिनांक १२ मार्च २०२६ गुरुवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

# गॅससाठी बोंबलणाऱ्यांनो कोविडमध्ये ३ वर्ष गप्प बसलात; आता देशासाठी २ महिने कळ सोसा

बीड दि.११ (प्रतिनिधी):– देश स्वातंत्र्य झाला त्यावर्षी अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले होते, अन्नाची टंचाई निर्माण झाली होती, त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी अन्नासाठी एक दिवस उपवास ठेवला होता. मात्र सध्या इस्त्राईल, अमेरिका विरुद्ध ईराण असे युद्ध सुरु आहे. अशा परिस्थितीत गॅस आणि पेट्रोल, डिझेलचा खूप मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असे देशभरात बिंबवले जात आहे. लोकं गॅस मिळेना म्हणून मरायलेत, गॅस मिळाला नाही तर त्यांचा मृत्यू होणार असे काहीसे चित्र चॅनलवाले आणि काही लोकांनी मांडले आहे. गॅससाठी इतकी ओरड सुरु आहे की देशाच्या संसदेत, राज्याच्या विधानसभेत, प्रत्येक चॅनलवर केवळ हाच विषय चघळला जाऊ लागला आहे. वास्तविक पाहता १ महिना नव्हे तर दोन – तीन महिने गॅस मिळाला नाही तरी लोकांचा स्वयंपाक बंद होणार नाही. कोविडमध्ये ३ वर्ष गप्प बसलात, जे मिळेल ते खाल्लं, परिस्थिती प्रमाणे राहिलात, मग आताच एवढं बोंबलायला काय झालयं? देशासाठी खूप काही सहन करावं लागतं, अजुन वर्षभर गॅस मिळाला नाही तरी सहन करण्याची ताकद ठेवली पाहिजे. गॅस मिळाला नाही म्हणून आपण खाणंपिणं सोडणार नाहीत. यापुर्वी काय घराघरात गॅसच होता काय? चलायला, फिरायला गाड्याच होत्या का? याचाही थोडा विचार करा.

## सावध रहा, अशाही अफवा मुद्दाम पसरविल्या जाऊ शकतात

पुढील काही दिवसात गॅस, पेट्रोल, डिझेल संबंधी काही लोकं सोशल मीडियावर अशाही अफवा आणि खोट्या बातम्या मुद्दाम पसरवू शकतात, त्यात पेट्रोल संपले, गॅसचा साठा फक्त ८ दिवसांचा उरला, हॉटेल्स बंद होत आहेत, रुग्णवाहिकेला डिझेल मिळत नाही यामुळे पेट्रोल पंपावर मोठ्या रांगा लागतील. गॅस सिलेंडरसाठी धावपळ होईल, कोविडमधील काही जुने फोटो आणि व्हिडीओ वापरुन सर्वसामान्य लोकांमध्ये भीती निर्माण केली जाऊ शकते. गर्दीचे व्हिडीओ व्हायरल करून आणखी अफवा पसरविल्या जातील, शेवटी ब्लॅकमध्ये दुप्पट पैसे मोजून इंधन खरेदी करावे लागेल, त्यामुळे जो पर्यंत सरकार किंवा प्रशासनाकडून अधिकृत माहिती दिली जात नाही तोपर्यंत कोणत्याही बातमीवर, सोशल मीडियावरील पोस्टवर, व्हिडीओवर लगेच विश्वास ठेवू नका, अफवांपासून सावध रहा, स्वत ;ही शांत रहा आणि इतरांनाही जागरुक करा.

## चॅनवाल्यांमुळे लोक विनाकारण जास्त स्टॉक करु लागले

सध्या युद्धाचे परिणाम देशात असे काही निर्माण झाले हे दाखवितांना चॅनलवाल्यांमध्ये मोठी स्पर्धा लागली आहे. घराघरात टीव्ही चालू केला की गॅसची टंचाई, पेट्रोल, डिझेलसाठी रांगा, हॉटेल व्यवसाय बंद, घरगुती गॅसचे भाव वाढले अशा बातम्या स्क्रीनवर दिसू लागल्या आहेत. काही चॅनलवाल्यांमुळे लोक विनाकारण गॅसचा स्टॉक करु लागले आहेत. पेट्रोल, डिझेल सुद्धा घरात आणून ठेवू लागले आहेत. इंधन साठा घरात ठेवणे हे धोकादायक आहे याचेही भान स्टॉक करणाऱ्यांना राहिलेले नाही.



## पेट्रोल, डिझेल कॅनमध्ये देऊच नका

बीड जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात कुठेही पेट्रोल, डिझेलची टंचाई नाही. विनाकारण पंपावर गर्दी करु नका असे स्पष्ट केलेले आहे, तरीही सर्वसामान्य लोकांच्या मनात टंचाईची भीती एवढी काही ठासून भरण्यात आली आहे की एखाद्या पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी मोटारसायकल घेऊन गेल्यास सोबत रिकामे कॅण्डसुद्धा घेऊन जाण्यात येत आहे. गाडीच्या टाकीत आणि कॅनमध्ये सुद्धा पेट्रोल, डिझेल घेतले जात आहे. विनाकारण साठेबाजी होत असल्यामुळे पेट्रोल, डिझेलची टंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे पेट्रोल, डिझेल कॅनमध्ये देऊच नये या संदर्भात जिल्हा प्रशासनाने सर्व पेट्रोल पंप चालकांना आदेशित करुन कॅनमध्ये पेट्रोल, डिझेल दिल्याचे आढळून आल्यास कारवाई होईल अशी तंबी द्यायला हवी.

देशात सध्या इस्त्राईल, अमेरिका विरुद्ध ईराण या युद्धामुळे काय काय पडसाद पडू लागलेत हे दाखविण्याची जणू काही स्पर्धाच लागली आहे. चॅनल सुरु केले की ठो ठो आवाज आणि गॅस नाही, पेट्रोल नाही, डिझेल नाही आता देश चलणार कसा? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. चॅनलवर जे सुरु आहे तेच देशाच्या सभागृहात आणि राज्याच्या विधानसभेतही सुरु आहे. विरोधकांसह सर्वच जण सभागृहात असे काही चित्र निर्माण करु लागले आहेत की भारतातील गॅस, पेट्रोल, डिझेल हे सगळं काही संपलयं. घराघरातल्या लोकांना खायला अन्न सुद्धा मिळेना असं दाखविलं जाऊ लागलं आहे. वास्तविक पाहता अशी कसलीही परिस्थिती नाही. मुबलक इंधन साठा आहे असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. गॅससाठी २५ दिवसांची एजन्सीकडे बुकींग चालू करण्यात आली आहे, एवढेच नव्हे तर पान २ वर

## बीडच्या अंबिका चौकात दोन गटात वाद

बीड दि.११ (प्रतिनिधी):- शहरातील शिवाजी नगर पोलीस ठाणे हद्दीतील अंबिका चौक परिसरात गाडीला कट मारल्याच्या कारणावरुन दोन गटात मोठा वाद झाल्याची घटना बुधवारी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली. दोन्ही गटाकडून एकमेकांच्या दिशेने दगडांचा मारा झाला असून काही जण जखमी देखील झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सदरील घटनेनंतर शिवाजी नगर पोलीस ठाण्यात मोठी गर्दी झाली होती. या प्रकरणात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

## १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांचा तुटवडा नाही

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसेवा):- देशातील चलनात १०,२० आणि ५० रुपयांच्या नोटांचा तुटवडा आहे का असा प्रश्न अनेकांना पडला आहे. रोखीचे व्यवहार करताना अनेक वेळा सुट्या पैशांची चणचण भासत होती. सुट्या पैशांची मागणी सर्रास होत होती. त्यात १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटां नाहीत असचं सांगितलं जात होतं. त्यामुळे खरोखर देशात या नोटांचा तुटवडा किंवा चणचण आहे का असा खरा प्रश्न होता. या चर्चांना आता केंद्र सरकारने पूर्णविराम दिला आहे. बाजारपेठेत कमी मूल्याच्या नोटांची कोणतीही कमतरता नसल्याचे सरकारने मंगळवारी राज्यसभेत स्पष्ट केले आहे.

## एसटीच्या बीड विभागात अधिकाऱ्यांच्या संगनमताने भ्रष्टाचार

### अपघातग्रस्त बसचे पैसे घेतले मात्र दफ्तरी नोंद नाही

**बीड दि.११ (प्रतिनिधी):– येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बीड विभागात अधिकारी संगनमताने भ्रष्टाचार करत असल्याचे प्रकरण उघडकीस आले असून याची तक्रार पुराव्यानिशी वरिष्ठांकडे देण्यात आलेली आहे.**

बीड आगाराच्या एम.एच.२० बीएल-१८९९ एसटी बसचा दि.८-१०-२०२५ रोजी कार क्रमांक एम.एच.२३ बीएच ७०२७ सोबत अपघात झाला होता. बीड आगाराचे वाहतुक निरीक्षक बन्सोडे यांनी त्रयस्त वाहन चालकाकडून एसटी बसचे चालक चव्हाण यांच्यामार्फत १५ हजार रुपये स्वीकारले, मात्र एसटीच्या खात्यात ५ हजार रुपये भरले, उर्वरीत रकमेचा अपहार केला. तसेच या अपघाताचा एफआयआर तयार न करता अपघात लपविला. दुसऱ्या एका प्रकरणात अंबाजोगाई आगाराच्या एम.एच.१४ बी.टी. २२३७ बसचा बीड आगाराच्या हद्दीत पेंडगाव येथे दि.१-११-२०२५ रोजी ट्रक क्रमांक एच.आर.३८ एसी ९३३८ सोबत अपघात झाला होता. बीडचे आगार प्रमुख तिडके यांचे वरिष्ठ लिपीक डिसले हे अपघातस्थळी गेले, त्यांनी त्रयस्त वाहन चालकाकडून रा.प.वाहनाचे चालक डी.बी.गुट्टे यांच्याकडून १७ हजार रुपये स्वीकारले व रा.प.दफ्तरी नोंद केली नाही, अपघात लपविला व पूर्ण रकमेचा अपहार केला. याची बातमी आल्यानंतर तिडके यांनी गुट्टे यांच्या नावाने बनावट पावती करुन १ हजार रुपये रा.प.खात्यात भरले. वरील प्रकरणाची पेपरला वाच्यता झाल्याने विभाग नियंत्रक श्रीमती दुसाने मॅडम यांनी या अपहाराच्या चौकशीसाठी यंत्र अभियंता चांडगिरे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती तयार केली, परंतु पाच महिने होऊन देखील वरील अपघाताचे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न सुरु आहे. चालक चव्हाण, वरिष्ठ लिपीक पान २ वर

## न.प.चे भाडे थकले तर सील करणं योग्य पण गाळ्यांची विक्री आणि हस्तांतर करता येतात

बीड दि.११ (प्रतिनिधी):– बीड नगर पालिकेने त्यांच्या मार्फत दिलेल्या गाळ्यांना भाडे थकल्यामुळे सील करायला सुरुवात केली आहे. अशी कारवाई नगर पालिकेला करता येते, या गाळ्यांचे हस्तांतरण आणि विक्रीही करता येते असे करारातच नमूद केलेले आहे. पालिकेकडे करार सापडत नाहीत त्यात भाडेकरुंचा दोष नाही, त्यावेळेस २ लाखाला घेतलेल्या गाळ्याची किंमत आज ६० लाख रुपये झाली आहे. त्याच बरोबर सध्या जे भाडे कर स्वरुपात घेतले जाते त्यावर दर ३ वर्षाला १०% भाडेवाढीची तरतूद आहे. बीड नगर पालिकेने त्यांच्या मालकीच्या गाळ्याचा किराया थकल्यामुळे काही गाळ्यांना सील लावले आहे. जर भाडे थकले असेल तर सील लावणे योग्य आहे, मात्र हे गाळे कोणाचे आहेत याचे देणे घेणे नाही. मूळ मालकाला हे गाळे दुसऱ्याच्या नावाने ट्रान्सफर करता येतात, विक्री करता येते असे ट्रान्सफर ऑफ प्रीव्हिलेज ॲक्युझीशन ॲक्टच्या पॅरा क्रमांक २१ मध्ये हे नमूद करण्यात आले आहे. बीड नगर पालिकेने शहरातील भाडे थकलेली काही गाळे सील केलेली आहेत. ही कारवाई योग्य आहे मात्र गाळे कोणाच्या नावावर आहेत, पान २ वर

## रमजान ईदपूर्वी कर्मचाऱ्यांचे मार्चचे वेतन करावे

## शिक्षक आमदारांच्या बघ्याच्या भूमिकेमुळे फेब्रुवारीचे वेतन रखडले

बीड दि.११ (प्रतिनिधी):- मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान ईद हा सण दिनांक २१ मार्च रोजी येत आहे. मात्र अद्याप माहे फेब्रुवारीचे नियमित वेतन निधी अभावी रखडले आहे ही खेदाची बाब असून या प्रकारामुळे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होऊ लागली आहे. फेब्रुवारीचे वेतन होवून मार्चचे नियमित वेतन २१ मार्च पूर्वी होणे आवश्यक आहे. रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र व महत्वाचा मोठा सण आहे. वेतन न झाल्यास सण कसा साजरा करणार असा प्रश्न कर्मचारी बांधवांना पडला आहे.

ही बाब शासकीय अधिकारी, शिक्षक आमदार, शिक्षणमंत्री यांनी गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. निधी अभावी नियमित वेतन रखडले असल्याने शिक्षक कर्मचारी यांच्यामध्ये संतापाची लाट पसरली आहे. शिक्षक आमदार मात्र बघ्याची भूमिका घेत आहेत. महाराष्ट्रातील शिक्षक आमदारांनी या प्रश्नाची गांभिर्याने दखल घेऊन तात्काळ फेब्रुवारीचे वेतनासाठी निधी वितरीत करणे तसेच मार्चचे वेतन रमजान ईद पूर्वी करावे यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करावा अशी मागणी हजारो कर्मचाऱ्यांमधून होत आहे. दरम्यान अनेक अनुदानित, अंशतः अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारीचे वेतन अजून सुद्धा झालेले नाही. या संदर्भात शिक्षण विभाग आणि वेतन अधीक्षक कार्यालयाने सुद्धा ही बाब पान २ वर

## बीडच्या कु.पुजा मुळेचे थायलंडमध्ये अपघाती निधन

बीड दि.११ (प्रतिनिधी):- बीड शहरातील परवाना नगर, खंडेश्वरी देवी रोड भागात राहणाऱ्या कु.पुजा प्रशांत मुळे (वय २६ वर्षे) हिचे पर्यटनासाठी थायलंड येथे गेली असता दि.५ मार्च रोजी अपघाती निधन झाले.

कु.पुजा प्रशांत मुळे B.E.Computer ही UBS कंपनी पुणे येथे नौकरी करत होती. ती पर्यटनासाठी थायलंड येथे गेली असता रस्ते अपघातामध्ये फुकेट जवळ कोसामुई बेटावर निधन झाले आहे. तिचा मृतदेह थायलंड येथुन आणण्यात येणार आहे. अंत्यविधी गुरुवारी अमरधाम मोंढारोड बीड येथे करण्यात येणार आहे.



तिचा मृतदेह थायलंडहून भारतात आणण्यासाठी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खा.बजरंगबप्पा सोनवणे, माजी जिल्हाधिकारी पाठक, सध्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पर्यटन व वाहतूक हवाई उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ - पुणे, अशोक थोरात साहेब यांनी उच्च पातळीवर प्रयत्न केले. कु.पुजाचे वडील हे पूर्णवादी बँकेत अधिकारी पदावर कार्यरत आहेत. मुळे परिवारावर कोसळलेल्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## कलेक्टर जॉन्सन साहेब, स्टेडियम जवळची नाली, मुतारी तोडायला लावली आता न.प.ला सांगून पुन्हा बांधायला तरी लावा



बीड दि.११ (प्रतिनिधी):- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेबांनी येथील जिल्हा स्टेडियमच्या बाजुला असलेली नाली बुजवायला लावली, मुतारी तोडायला लावली. त्या भागातील लोकांनी एवढं काय वाईट केलं होतं की तुम्ही ते तोडायला लावलं. बरं तोडायला लावलं तर लावलं किमान आता नगर पालिकेला सांगून मुतारी बांधायला लावा आणि तो रोड सुद्धा करुन घ्यायला लावा. रोडवर एवढे खड्डे पडले आहेत की तिथून जायचं म्हटलं तरी अंगावर काटा उभा राहू लागला आहे.

बीड शहरातील स्टेडियम जवळ असलेली नाली काही महिन्यापुर्वी जिल्हाधिकारी साहेबांनी बुजवायला लावली, त्याच बरोबर त्या ठिकाणी असलेली मुतारी सुद्धा तोडायला लावली होती. अनेक महिने उलटले तरीही तिथं नवीन काहीच झालं नाही, त्यामुळे या भागातील लोकांची आणि स्टेडियमवर येणाऱ्या नागरिकांची मोठी अडचण होऊ लागली आहे. शहरात आधीच स्वच्छतागृह नाहीत, स्टेडियम रोडला तेवढीच एकुलती एक मुतारी होती, ती सुद्धा तोडली गेली. पान २ वर

### लाचखोरीच्या प्रकरणानंतर पोलीस अधीक्षकांची कारवाई

## एपीआय संदीप पाटील, पो.कॉ.सुरवसे यांच्यासह पो.ह.अमोल येळे निलंबित

बीड दि.११ (प्रतिनिधी) :- गेवराई तालुक्यातील चकलंबा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांवर काल रात्री उशिरा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. या कारवाईत एक-दोन नव्हे तर तीन लाचखोर पोलीस एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. काल रात्री उशिरापर्यंत एपीआय संदीप नाना पाटील (वय ४६), पो.कॉ.विनोद मधुकर सुरवसे (वय ३६) यांचीच नावे समोर आली होती. मात्र या प्रकरणात लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदाराला प्रोत्साहित करणारा पो.ह.अमोल येळे हा देखील लाचलुचपतच्या कचाट्यात सापडला आहे. दरम्यान पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी लाचखोरांना चांगलाच दणका दिला असुन एपीआय संदीप पाटील, पो.कॉ.विनोद सुरवसे आणि पो.ह.अमोल येळे या तिघांनाही तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

बीड येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार दि.९ मार्च २०२६ रोजी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता एपीआय पाटील व तक्रारदार यांची चकलांबा ठाण्यात भेट झाली. भेटीदरम्यान कामासंबंधी चर्चा झाली, त्यावेळी पाटील यांनी चकलांबा हद्दीतून वाळूच्या टिप्परची वाहतूक करण्याकरिता १५ दिवसांसाठी ६० हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदाराने कमी करा अशी विनंती केली पान २ वर

### शिक्षणाधिकाऱ्यांच्या भेटीत होती अनुपस्थिती

## खालापुरीच्या चार शिक्षकांना नोटीसा

बीड दि. ११ (प्रतिनिधी):- बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी शिरूर (कासार) तालुक्यातील खालापुरी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेवर मंगळवारी अचानक सकाळी भेट दिली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक अनुपस्थित असल्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी स्वत: परिपाठ घेऊन शाळा सुरू केली. अनुपस्थित असलेल्या शिक्षकावर कारवाई करण्यात आली आहे. सातपैकी चार शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस देऊन याबाबत खुलासा मागविला आहे. शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी दि.१० मार्च रोजी शिरूर तालुक्यातील ३ शाळेला भेटी दिल्या. मंगळवारी सकाळी ८.३० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खालापुरी येथे भेट दिली असता पान २ वर

### मेंढ्यांच्या धक्क्याने मोटारसायकल पडल्याने झाला वाद

## व्हिडिओ काढतो म्हणत शिवीगाळ करत लाकडाने कुऱ्हाडीने मेंढपाळ दोन भावांवर हल्ला





माजलगाव दि.११ (तुकाराम येवले):- दोन सख्खे भाऊ मेंढ्या घेऊन पात्रुड घरातवाडी शिवारात चारण्यासाठी येऊन गेले होते. दरम्यान रस्त्यावर उभे असलेली मोटरसायकलला मेंढ्याने धक्का दिल्याने मोटारसायकल पडल्यामुळे या किरकोळ कारणावरून शाब्दिक बाचाबाची झाली आणि मोटरसायकलचे नुकसान भरून दे म्हणत या मेंढपाळावर संतापलेल्या घडाटवाडी येथील दोन बांधवांनी काठीने आणि कुऱ्हाडीने सपासप वार करीत हल्ला चढवला, व्हिडिओ काढतो ? असे म्हणत अर्वाचे भाषेत शिवीगाळ करत दोन्ही भावांना हल्ला करून जबर जखमी केले आहे.

### आरोपींना अटक करण्याची मागणी

तालुक्यातील घळाटवाडी शिवारात दोन मेंढपाळ बांधवांवर हल्ला झाल्याची घटना पान २ वर



हल्ला झालेल्या दोन मेंढपाळ बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी आज ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके माजलगावात येणार

# महिलांनी महिलांचा सन्मान केल्यानंतरच खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा होईल - संध्या देशमुख

### नेताजी सुभाष चंद्र बोस विद्यालयात महिला दिन निमित्त विविध कार्यक्रम



माजलगाव दि.११ (प्रतिनिधी):- दि.८ मार्च रोजी सर्वत्र साजरा होणारा महिला दिन नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातही उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यालयात भरघोस कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा संध्या देशमुख यांनी महिलांनी महिलांचा सन्मान केल्यानंतरच खऱ्या अर्थाने ' महिला दिन 'साजरा होईल तसेच महिलांच्या विकासासाठी व प्रगतीसाठी इतर महिलांचे ही सहकार्य आवश्यक आहे असे मार्गदर्शन त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. व्यासपीठावरील अधीक्षक राजेश सुरवसे ,मुख्याध्यापिका नवनाथ कदम आदी मान्यवरांनी ही मनोगत व्यक्त केले. शाळेतील विद्यार्थिनींनी अगदी परंपरेने चालत आलेल्या तसेच आधुनिक काळामध्ये स्त्रियांची झालेली प्रगती वेशभूषा आणि नृत्य व गीतांमधून श्रीमती चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केली.महिलां पालकांसाठी मनोरंजनासाठी विविध खेळ,स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय कष्ट घेऊन जिद्दीने यश संपादन केलेली महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत कनिष्ठ अभियंता स्थापत्य कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथे निवड झालेली विद्यार्थिनी स्वप्नाली देशमुख तिच्या पालकांचा तसेच कष्टकरी महिलांचा सन्मान करण्यात आला.
एकूणच महिला दिन निमित्त सर्व शिक्षकवृंद ,कर्मचारी वर्ग विद्यार्थी वर्ग व पालक वर्ग या कार्यक्रमात उत्स्फूर्त उत्साहात सहभागी झाले होते.

# मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आई-वडिलांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक -डॉ.दिपाताई क्षीरसागर



बीड दि.११ (प्रतिनिधी):- ८ मार्च महिला दिनानिमित्त बीड येथे योगेश्वर सेवाभावी संस्था, मदर तेरेसा बालक आश्रम तसेच महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सन्मान मातृत्वाचा सन्मान कर्तृत्वाचा या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सौ. रश्मीताई प्रीतम शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पार पडला.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दत्ता नलावडे (माजी अध्यक्ष, बालकल्याण समिती) यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी सन्मान मातृत्वाचा सन्मान कर्तृत्वाचा या कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. कुटुंबासाठी स्वतःची स्वप्ने बाजूला ठेवून मुलांना त्यांच्या ध्येयापर्यंत पोहोचवण्यासाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या मातांचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.
यानंतर डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी आपल्या प्रभावी मार्गदर्शनातून पूर्वीच्या आणि आजच्या स्त्रियांच्या भूमिकेतील बदल अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत मांडला. काव्य, शेर-शायरीच्या माध्यमातून त्यांनी उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला. प्रत्येक स्त्रीच्या यशामागे पुरुष असतो आणि प्रत्येक पुरुषाच्या यशामागे स्त्री असते; संसाराच्या रथाची ही दोन्ही चाके आहेत असे सांगत मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आई-वडिलांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.
प्रीतम शिंदे यांनीही महिलांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत रेश्मीताई शिंदे यांच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी केलेली सामाजिक कामे व रोजगार निर्मिती याबाबत माहिती देत महिलांनी आत्मविश्वासाने पुढे यावे असे आवाहन केले.रेश्मीताई शिंदे यांनी महिलांना आपल्या अंगी असलेले कौशल्य जपण्याचा व त्याचा उपयोग जीवन उभारण्यासाठी करण्याचा सल्ला दिला.

# पुण्यातील वाघोली येथून अल्पवयीन मुलीची सुटका, बीडच्या पथकाची कारवाई



बीड दि.११ (प्रतिनिधी):- माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अपहरणाच्या गुन्ह्यातील अल्पवयीन पीडितेची सुटका करण्यात बीडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला यश आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून गुंगारा देणाऱ्या आरोपीला पुणे जिल्ह्यातील वाघोली येथून पोलिसांनी शिताफीने ताब्यात घेतले. या प्रकरणात पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा माग काढला. संशयित आरोपी वाघोली येथील एका कंपनीत काम करत असल्याची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तेथे सापळा रचला. आरोपी दुचाकीवरून बाहेर पडल्यानंतर पोलिसांनी त्याचा पाठलाग केला आणि एका बँकेतून त्याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याच्या राहत्या ठिकाणाहून पीडित मुलीची सुटका करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पुढील तपासासाठी दोघांनाही माजलगाव पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

# देशात एस्मा लागू

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसेवा):- अमेरिका, इस्त्रायल आणि इराणमध्ये ११ दिवसांपासून भयंकर युद्ध सुरूच आहे. आखाती देशांमध्ये युद्धाची आग धुमसत असल्याने येथून भारताला होणारा खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रासह संपूर्ण देशात घरगुती गॅस, नैसर्गिक वायू आणि व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. पुढील काही दिवस युद्ध सुरु राहिल्यास ही परिस्थिती आणखी गंभीर स्वरुप धारण करु शकते. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.
गॅसचा तुटवडा जाणवू लागल्याने केंद्र सरकारने देशभरात एस्मा अर्थात आवश्यक सेवा पुरवठा अधिनियम कायद्याची अंमलबजावणी केली आहे. या कायद्यामुळे आता देशभरात आवश्यक वस्तूंची साठवणूक आणि काळा बाजार करण्यावर प्रतिबंध लागणार आहे. आखात देशांमध्ये सुरु असलेल्या युद्ध परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याचे समजते. आखाती देशांमधील युद्ध परिस्थितीमुळे जगभरात इंधन टंचाईचे संकट जाणवू लागले आहे. भारतात व्यावसायिक आणि घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा तुटवडा जाणवत आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये अनेकांनी गॅस सिलेंडर मिळत नसल्यामुळे एजन्सीबाहेर रांगा लावल्याचे चित्र आहे.
त्यामुळे आता केंद्र सरकारने देशभरात एस्मा कायदा लागू केला आहे. जेणेकरुन घरगुती एलपीजी अर्थात गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल.

पान १ वरून

## गॅससाठी बोंबलणाऱ्यांनो, २ महिने कळ सोसा

गॅस, डिझेल, पेट्रोलची साठेबाजी होऊ नये यासाठी कायदा लागू केला असून स्वतः जिल्हाधिकारी यावर लक्ष ठेवून आहेत. जिल्हा प्रशासनाने या संदर्भात कुठेही टंचाई नाही असे स्पष्ट केलेले आहे, तरी देखील गॅस, डिझेल आणि पेट्रोलची प्रचंड प्रमाणात टंचाई आहे असे दाखविण्याचे प्रयत्न काही चॅनलवाले आणि विरोधक करु लागले आहेत. लोक सुद्धा त्यांच्या सुरात सुर मिसळत गॅस नाही, पेट्रोल नाही, डिझेल नाही असं म्हणू लागलेत. हेच लोक कोविडमध्ये ३ वर्ष गप्प बसले. गॅस मिळाला नाही तर चुलीवर स्वयंपाक केला. पेट्रोल, डिझेल भेटले नाही म्हणून गाड्या घरात लावल्या. मग याच लोकांना आता देशासाठी २-३ महिने कळ सोसली जात नाही का? देशासाठी आहे त्या परिस्थितीत राहिलात तर काय बिघडलं. तसही गॅस मिळाला नाही तर कुणीही उपाशी मरणार नाही. यापुर्वी स्वयंपाकासाठी गॅसच होता का? पेट्रोल, डिझेल नाही भेटलं म्हणून सगळं काही थांबणार अशातला भाग नाही. नाही तर नाही भेटलं, त्यालाही पर्यायी उपाययोजना आहेत पण हे सगळं संपलयं असं म्हणून जे कोणी बोंबलू लागलेत त्यांनी स्वतः आत्मचिंतन करायला हवे.

## न.प.चे भाडे थकले तर सील करणं योग्य पण...

**ते ट्रान्सफर कसे केले? ते विकता येतात का? तर या सर्वांचे उत्तर होय आहे. तेंव्हाच्या गाळ्याची आताची किंमत काढून संभ्रम निर्माण केला जात आहे. मात्र त्या वेळेस २ लाख रुपयांना घेतलेल्या गाळ्याची किंमत आज ६० ते ६२ लाख रुपये झाली आहे. त्यामुळे यात काहीही नाही. नगर पालिकेने थकबाकी असलेल्या गाळ्यांची वसुली करावी अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.**

## रमजान ईदपुर्वीच मार्चचे वेतन करावे...

गांभीर्याने घेऊन तात्काळ निधी उपलब्ध करून घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याची मागणी होऊ लागली आहे.

## एस.टी.च्या बीड विभागात भ्रष्टाचार...

डिसले स्वतःहून कबुली जबाब देत असतांना त्यांचा जबाब घेण्यास चांडगिरे यांनी नकार दिला आहे. या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची तक्रार परिवहन मंत्री व व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक एसटी मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांच्याकडे पुराव्यानिशी करण्यात आलेली आहे, अशी माहिती मोहम्मद जुबेरउल्ला खान (रा.शहेनशाह नगर, बीड) यांनी केली असून सोबत सर्व पुरावे, पैसे भरल्याच्या पावत्या, बँक स्टेटमेंट सोबत जोडली आहेत.


## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की श्री.अनिल सटवाजी ढोकणे, रा. नागापुर (बु) ता.जि.बीड यांच्या मालकीचे कसबे बीड तरफ खोड गयानगर जालना रोड, बीड येथील नगर परिषद हद्दीचे आतील सर्व्हे नं.९४ मधील प्लॉट ज्याचा न.प.मालमत्ता क्रमांक १-६-५३३१ असा आहे. ज्याचे एकुण क्षेत्रफळ १११.५२ चौ.मी. म्हणजेच १२०० चौ. फूट आहे. प्लॉट मिळकत खरेदी करण्याचा ठराव झाला आहे. याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व-सरकारी रस्ता,पश्चिम-वडमारे यांचे घर, दक्षिण-वानखेडे यांचा प्लॉट, उत्तरेस-संतोष घाडगे यांचा प्लॉट, उपरोक्त नमुद प्लॉटचा खरेदीचा करार सौ.संध्या रविंद्र दुनघव रा.बीड यांनी केलेला असून सदर प्लॉट संपुर्णपणे निर्विवाद, निर्जोखमी व बोजा विरहीत असल्याची तोंडी खात्री त्यांनी मला दिलेली आहे. सदर प्लॉट संदर्भात कोणाचे काही हक्क संबंध, अधिकार, हक्क, उजर तसेच सदर घरजागे संदर्भात कोणाचे काही ईसार, दान, गहाण, तारण, बक्षीस, आममुखत्यार पत्र, साठेखत, चोळी बांगडी इत्यादी प्रकारचे सुप्त हक्क व अधिकार असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ८ (आठ) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यासह समक्ष येवून आपल्या हरकती नोंदवाव्यात. तोंडी कल्पना देवून आलेले आक्षेप, अधिकार, हक्क व उजर विचारात घेतले जाणार नाहीत. मुदतीनंतर आलेले आक्षेप, हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व सदर प्लॉट हा निर्विवाद, निर्जोखमी व बोजा विरहीत आहे असे समजून सदर घरजागेचा कायमचा खरेदीखताचा व्यवहार करण्यात येईल.

करीता माहितीस्तव हे जाहीर प्रगटन.

**ठिकाण: बीड**
**दिनांक : ०७/०३/२०२६**

**- जाहिर प्रगटन देणार -**
**सौ.संध्या रविंद्र दुनघव**
**रा.बीड**
P.P.


## कलेक्टर जॉन्सन साहेब, स्टेडियमजवळची नाली, मुतारी बांधायला तरी लावा

या भागातील लोकांनी एवढं काय वाईट केलं होतं की तिथली आवश्यक मुतारी सुद्धा तोडून टाकण्यात आली. यामुळे प्रचंड गैरसोय होऊ लागली आहे. नाली बुजविण्यात आल्यामुळे तेथील सांडपाण्याचा प्रश्न देखील गंभीर बनला आहे. जिल्हाधिकारी जॉन्सन साहेबांनी यामध्ये स्वतः लक्ष घालावे आणि नगर पालिकेला आदेशित करुन स्टेडियम जवळ स्वच्छतागृह बांधायला लावावे, त्याचबरोबर या रोडचे काम सुरु करण्या संदर्भातही सूचना द्याव्यात अशी मागणी होऊ लागली आहे.

## मेंढ्यांच्या धक्क्याने मोटारसायकल पडल्याने माजलगावात वाद

दि.११ मार्च बुधवार रोजी घडली असून या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याची मागणी सकल धनगर ओबीसी समाजाच्या वतीने ग्रामीण पोलिसांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तर हल्ला झालेल्या मेंढपाळ दोन बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी आज दि.१२ मार्च रोजी ओबीसी नेते लक्ष्मण हाके माजलगावात येऊन आंदोलन करणार आहेत.
वडवणी तालुक्यातील पुसरा येथील मेंढपाळ निवृत्ती चंदू बिटे व लहू चंदू बिटे हे माजलगाव तालुक्यातील पात्रुड आणि घळाटवाडी शिवारात मेंढ्या चारत असताना रस्त्यामध्ये मोटरसायकल उभी होती आणि मेंढरांनी ती मोटरसायकल पाडल्यामुळे या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून शिवीगाळ गणेश पांडुरंग नरवडे व आनंद पांडुरंग नरवडे यांनी या दोघांवर अर्वाच भाषेत शिवीगाळ करत लाकडाने व कुऱ्हाडीने हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे.
या हल्ल्यात जखमी झालेल्या दोन्ही मेंढपाळांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सकल धनगर ओबीसी समाजात संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अन्यथा दि.१२ गुरुवार पासून ग्रामीण पोलीस स्टेशनसमोर सकल धनगर ओबीसी समाजाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा विलास नेमाने, संतोष देवकते, अविनाश कांडुरे, अर्जुन भुतकर, राज अर्जुन, विजय धायगुडे, कल्याण कस्पटे विशाल देवकते शंकर गावडे दत्ता आबुज मनोज कोरडे यांनी दिला आहे.

## लाचखोरी प्रकरणी पो.ह.अमोल येळे निलंबीत

असता पाटील यांनी तडजोडीअंती ५० हजार रूपये पो.कॉ.सुरवसे यांच्यामार्फत स्विकारण्याचे मान्य करून उर्वरित १० हजार रूपये दोन दिवसांनी स्विकारण्याचे मान्य केले. त्याच दिवशी लाचलुचपत प्रतिबिंधक विभागाने उमापुर पोलीस चौकीत पो.कॉ.सुरवसे यांच्याकडे कारवाईसाठी सापळा लावला. मात्र सुरवसे आलेच नाहीत. त्यामुळे दि.१० मार्च रोजी रात्री उशिरा उमापुर पोलीस चौकी येथे एसीबीने पुन्हा सापळा लावला. यावेळी पो.कॉ.विनोद सुरवसे याने शासकीय पंचासमक्ष ५० हजार रूपयांची लाच रक्कम स्विकारली. त्याचवेळी चकलांबा ठाण्यातील पो.ह.अमोल येळे यांनी सहा पेट्या, सहा जिल्हा परिषद सदस्य असे कोडवर्डमध्ये आरे कर ना... असे म्हणून तक्रारदारास लाच रक्कम देण्यास प्रोत्साहित करून निघून गेला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सुरवसे याला ताब्यात घेऊन पंचासमक्ष लाच रक्कम जमा केली. त्यानंतर सपोनि संदीप नाना पाटील यांनाही ताब्यात घेतले. या प्रकरणात सपोनि. संदीप पाटील,पो.कॉ.विनोद मधुकर सुरवसे आणि तक्रारदारास लाच दे म्हणून प्रोत्साहित करणारा पो.ह.अमोल येळे यांच्याविरूध्द चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पत्रकातून म्हटले आहे. सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधिक्षक माधुरी केदार, अप्पर अधिक्षक शशिकांत शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड येथील डीवायएसपी सोपान चिट्टमपल्ले, पो.नि.समाधान कवडे, राहुलकुमार भोळ, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, अनिल शेळके, पांडुरंग काचगुंडे, अमोल खरसाडे, संतोष राठोड, अविनाश गवळी, प्रदिप सुरवसे, राजकुमार आघावा, बिभीषण सांगळे, सचिन काळे, चालक अंबादास पुरी, गणेश म्हेत्रे यांनी केली.

## खालापुरीच्या चार शिक्षकांना नोटीसा...

शाळेतील सर्व शिक्षक अनुपस्थित होते. मात्र तीन शिक्षक मेहेत्रे, तहकीक, तांबे, हे परिपाठ सुरू असताना आल्यामुळे त्यांना नोटीसातून वगळण्यात आले आहे. खालापुरी प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक अशोक सानप, गोकुळ भुतकर, जगदीश ननवरे, श्रीमती पद्मिन बडे, या चार शिक्षकांना नोटिसा देऊन खुलासा मागवला आहे.

पान ६ वरून

## पैठण-पंढरपूर पालखी मार्गाला शहरी भागातच हद्दीचे ग्रहण

दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्र ते शहरातील जिजामाता चौक, सिंदफणा कॅनल पर्यंत पालखी मार्ग व राजूरी (नवगन)- चिंचपूर मार्ग एकत्रितपणे मार्गस्थ होत आहे. शहरीभागातून दोन्ही मार्ग एकत्रित होत असल्याने रस्त्याची रुंदी संभाव्य वाहतूक कोंडी लक्षात घेता किमान ३६ मिटर असणे आवश्यक आहे. सध्या वाहतूकीची वर्दळ पाहता अपघात टाळण्यासाठी किमान शहरी भागात पुरता डिव्हायडरयुक्त महामार्ग अत्यावश्यक आहे. मात्र, जबाबदार प्रशासन व कंत्राटदार कंपनीच्या संगणमताने चक्क शहरी भागात केवळ २४ मिटर नाल्यासह व २० मिटर (६५ फूट) नाल्या वगळता नियोजीत मजबुतीकरण करण्यात येत असल्याने पालखी मार्गाला शहरतच हद्दीचे ग्रहण लागल्याच्या भावना वारकरी, ग्रामस्थ नागरीकांतून व्यक्त होत आहेत.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट ठार

मृत्यूमुखी पडल्याची माहिती त्यांनी फोनद्वारे वनरक्षक महेश मेटे यांना दिली तसेच वनकर्मचारी तातडीने पाठविण्याची विनंती केली.राष्ट्रीय महामार्ग ५४८-डी वर हरिण व काळवीट अज्ञात वाहनांच्या धडकेत जखमी होण्याच्या किंवा मृत्यूमुखी पडण्याच्या घटना वाढत आहेत. गेल्या महिन्यातही याच मुळुकवाडी शिवारात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या हरिणाला ग्रामस्थांच्या मदतीने वाचविण्यात यश आले होते. मात्र यावेळी काळवीटाचा जागीच मृत्यू झाला.या ठिकाणी वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी सावधानतेचे फलक लावावेत व वाहनचालकांना वेग मर्यादा पाळण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## बीडमध्ये मोगरा फुलला संगीतमय कथा

जीवनचरित्र अभंग, कथा व निरूपणाच्या माध्यमातून सादर करण्यात येणार आहे.हा कार्यक्रम सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य असून नागरिकांनी व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तीमय कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी बनवले एलईडी स्क्रीन

उद्योगांमध्ये माहिती वितरण आणि दृश्य अनुभवांसाठी उत्कृष्ट साधने उपलब्ध झाली आहेत. याच तंत्रज्ञानाच्या वापर करून एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध सूचना, अत्याधुनिक माहिती घेता येणार आहे. उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर,जेष्ठ सल्लागार प्रा. एम.एस.लोमटे,रमण सोनवळकर,मेजर एस. पी.कुलकर्णी,प्राचार्य रमण देशपांडे, विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा.नारायण सिरसाट,प्रा.अतुल फड,प्रा.श्याम गडदे प्रा.बप्पासाहेब सोनवणे व पॉलिटेक्निकचे शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## पिंपळनेरसह ग्रामीण भागात पुन्हा चुली पेटल्या

पर्याय स्वीकारला आहे.पिंपळनेर परिसरातही काही घरांमध्ये चुली पेटताना दिसत आहेत. ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतीमालाला हमीभाव मिळणे तसेच इंधनदरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत. अन्यथा, येत्या काळात ग्रामीण भागातील कुटुंबांना आणखी कठीण परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो.

## चकलांबा पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी एपीआय सचिन इंगळे

हे जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांचे मार्गदर्शनाखाली जनसंपर्क अधिकारी म्हणून उल्लेखनीय काम केले आहे. इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियातील सर्वच पत्रकारांशी सौदाह्यपूर्ण आणि जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. शांत, मितभाषी, संयमी आणि कार्यतत्पर अधिकारी म्हणून सुपरीचीत आहेत.

## अधिवेशनात अभ्यासपूर्ण मुद्दा मांडत शासनाला निर्णयाची मागणी

अनेक ठिकाणी महिलांच्या नावाने दूध उत्पादक सहकारी संस्था स्थापन केल्या जात आहेत. मात्र प्रत्यक्ष आर्थिक लाभ महिलांपर्यंत पोहोचत नसेल तर त्या उपक्रमाचा उद्देश अपूर्ण राहतो. त्यामुळे महिलांच्या नावावर असलेल्या संस्थांमधील दूध मोबदला थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.
माय-माऊलींच्या हातात पैसा गेला, तर त्या त्याचा योग्य हिशोब ठेवून कुटुंबाच्या हितासाठी वापर करतात. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्यासही मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या मांडणीदरम्यान सभागृहात उपस्थित सदस्यांनीही या वास्तवाकडे लक्ष वेधले गेल्याची दखल घेतली. ग्रामीण महिलांच्या श्रमांना योग्य आर्थिक अधिकार देण्याच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा असल्याचे मत अनेक सदस्यांनी व्यक्त केले.ग्रामीण भागातील महिला सशक्तीकरण, कुटुंबाच्या आर्थिक व्यवस्थापनात त्यांचा सहभाग आणि दूध व्यवसायातील पारदर्शकता वाढवण्यासाठी शासनाने या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही धस यांनी व्यक्त केली.
दूध व्यवसायातील महिलांचे योगदान मोठे असून त्यांना आर्थिक अधिकार मिळणे ही काळाची गरज आहे. सभागृहात मांडलेला हा मुद्दा ग्रामीण महिलांच्या सन्मानाशी आणि आर्थिक स्वावलंबनाशी निगडित असल्याने या मागणीची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

## पदोन्नती कृती समितीचे जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण

अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक (प्रा.) व प्राथमिक पदवीधरपदी पात्र शिक्षकांना नियमाप्रमाणे पदोन्नती प्रक्रिया राबवुन समुपदेशनाने तात्काळ पदोन्नती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन केंद्रप्रमुख (समुह साधन केंद्र समन्वयक) अधिसूचना सेवा प्रवेश नियम २०२५, सर्वोच्च न्यायालय निर्णय दि. १ सप्टेंबर २०२५, अव्वर सचिव महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि. २९/०१/२०२६, शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दि ९ सप्टेंबर २०२६ नुसार पदोन्नती कृती समिती मार्फत बुधवार दि. ११ मार्च पासून जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. १) केंद्रप्रमुख अधिसूचना सेवा प्रवेश नियम २०२५ मधील तरतुदी व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ढ्ए्ढ/उढ्एढ उत्तीर्ण पात्र शिक्षकांना तात्काळ केंद्रप्रमुख पदी पदोन्नती देण्यात यावी. २) केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी प्रसिध्द केलेल्या यादीवर आलेल्या आक्षेपांची तात्काळ प्रत्यक्ष सुनावणी घेवून सुधारित यादी प्रसिध्द करण्यात यावी, ३) केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रीयेत अपात्र उमेदवारांचा समावेश करण्यात येवू नये. ४) केंद्रमुख पदोन्नती प्रक्रिया समुपदेशनाव्दारे तात्काळ राबविण्यात यावी. ५) संच मान्यता २०२५-२६ मुळे अतिरिक्त झालेल्या शिक्षकांना जिल्ह्याबाहेर जाण्याची वेळयेऊ नये, आदी मागण्यासाठी साखळी उपोषण सुरू केले आहे.सकाळी उपोषणात पदोन्नती कृती समितीचे सुभाष सारूक, मुकुंद घोडके आणि त्याचे सहकारी सहभागी झाले आहेत.

## महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना बीडच्या वतीने

या मेळाव्यास कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त विभागीय अध्यक्ष तथा कार्यक्रमाध्यक्ष मा. उमाकांत दांगट, प्रमुख मार्गदर्शक राज्य कार्याध्यक्ष मनोहरजी पोकळे, विशेष प्रमुखा अतिथि तथा संघटनेचे विभागीय सरचिटणीस व बीड जिल्हा परिषदेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोकरावजी कोल्हे हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. दिनांक १३ मार्च २४ रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील सामाजिक न्याय भवन,शासकीय विश्रांम गृहा स्मोरिल येथील सभागृहामध्ये भव्य असा कार्यक्रम होणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व विभागाच्या सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष जालिंदर भोरे, प्राचार्य डीजे तांदळे ,कांचन गायकवाड ,गौतम चोपडे, तुकाराम पवार ठाकूर, यांनी केले आहे .हा मेळावा यशस्वी करण्यासाठी शिवाजी बांगर, बाळासाहेब खेडकर, प्रकाश करपे ,प्रकाश वक्ते, अँड. राजन साळवी, सुरेश खंदारे, दिलीप साळवे, सुधाकर बोबडे ,आर के मते, श्रीमती विजया सानप, सुनंदा कुलकर्णी ,उस्मानी नाजमा, शंकर बुरांडे ,सोपानराव पवार, सुभाष ,रमेश कांबळे दादासाहेब बोराडे ,दत्तू डोळस, चौरे तसेच तालुका अध्यक्ष व सदस्यांनी केले आहे.

## आ.नमिता मुंदडा सभागृहात आक्रमक

राजधानी असलेल्या मुंबईत २०२४ मध्ये ४३० प्रकरणे नोंदवली गेली. धक्कादायक म्हणजे, २०२५ च्या सुरुवातीच्या काही महिन्यांतच हा आकडा १६० च्या पार गेला आहे.

मराठवाडा आणि ग्रामीण भागातील 'दुष्टचक्र'

आ. नमिता मुंदडा यांनी विशेषतः मराठवाडा आणि बीड जिल्ह्यातील परिस्थितीवर भाष्य केले. त्यांच्या मते ग्रामीण भागात आजही हुंडा देणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जाते. दुष्काळ आणि सततच्या आर्थिक अडचणींमुळे मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढणे आणि त्यातून हुंड्याची मागणी पूर्ण करताना कुटुंब उद्ध्वस्त होत आहेत. बीडसह मराठवाड्यात हुंड्याच्या मागणीमुळे महिलांचा होणारा छळ ही एक सामाजिक आणीबाणी बनली असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रशासनाकडून ठोस कृतीची मागणी

केवळ कायदे असून उपयोग नाही, तर त्याची अंमलबजावणी कडक व्हावी आणि सामाजिक स्तरावर जनजागृती व्हावी, अशी मागणी या चर्चेदरम्यान करण्यात आली. दुष्काळ आणि गरिबीशी लढणाऱ्या मराठवाड्यातील कुटुंबांना हुंड्याच्या जाचातून मुक्त करण्यासाठी सरकारने विशेष पावले उचलण्याची गरज आहे, असे आवाहन मुंदडा यांनी केले.

## डोंगरकिन्ही येथे उद्या होणार नर्मदा परिक्रमा

सर्वच सहभागी परतीच्या प्रवास वरुन ते १३ मार्च रोजी येत असल्याने त्यांचे मोठ्या आनंदाने भव्यदिव्य मिरवणूक स्वागत व संताचे दर्शन सोहळ्याचे आयोजन डोंगरकिन्ही येथे करण्यात आले आहे.या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता होणार असून सकाळी ८ ते ११ या वेळेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पुणे येथील सुप्रसिद्ध ढोल पथक, बॅण्ड पथक, लेझीम पथक, हत्ती-घोड्यांची मिरवणूक, तसेच लातूर येथील प्रसिद्ध रांगोळी कलाकारांचे आकर्षक रांगोळी सादरीकरण तसेच विशेष आकर्षण म्हणजे हरीयाणा येथील प्रसिद्ध अघोरी बाबा यांचा विविध कला गुणांचा कार्यक्रम ही पर्वणी म्हणावे लागेल. तसेच आळंदी येथील प्रसिद्ध भजनी मंडळाच्या भजनाने वातावरण भक्तिमय होणार आहे. मिरवणुकीनंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत साधुसंतांचे स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर ११.३० ते १ या वेळेत साधु महात्म्यांचे मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण कार्यक्रमासाठी आकर्षक सजावट, अतिशबाजी तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. धार्मिक उत्साहात पार पडणाऱ्या या सोहळ्यास मान्यवर संत महंत विठ्ठल महाराज गहिणीनाथ गड, हभप मधुकर महाराज, हभप महादेव महाराज, हभप विष्णु देवानंदजी भारती, शिवानंद महाराज सरस्वती महेंद्र महाराज शास्त्री, गोपाला नंदगिरी महाराज, बालयोगी ऋषीनाथ महाराज, शिवानंद महाराज तांबाराजुरी, उमानंद सरस्वती महाराज, गणेश महाराज पिंपळनेर यांचा दर्शन सोहळा व मार्गदर्शन लाभणार आहे.सोहळा यशस्वी करण्यासाठी मा सरपंच आप्पासाहेब येवले, डॉ भागवत जेधे, अरुण येवले, भाऊसाहेब तुपे, परमेश्वर सातपुते, सखाराम आतकरे यांच्या सह अनेक युवक रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. डोंगर किन्ही येथे आजवरच्या काळात प्रथमच एवढा मोठा कार्यक्रम होत आहे. कार्यक्रमाची उत्सुकता शिगेला पोहोचली असून या भव्य धार्मिक सोहळ्याला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. श्री स्वामी हरिहरानंद सरस्वती महाराज है एक त्यागी संत असुन त्यांनी डोंगरकिन्ही येथे स्वतः ची अनुष्ठान पर्णकुटी आश्रम उभारला आहे . याच परीसरात त्यांचा जि.प.शिक्षक म्हणून झालेली सेवा ते स्वामी होण्यापर्यंतचा बदल हा एक संत अवताराचा प्रवास म्हणावा लागेल . एक तेजस्वी , आदर्श अशी त्यांची प्रतिमा आहे. नुकताच त्यांनी पायी नर्मदा परिक्रमा पूर्ण करुन ते आपल्या आश्रमाकडे येत आहेत. परीसराचे भाग्य, वैभव , आपले लाडके स्वामींच्या दर्शनासाठी ग्रामस्थ आतुर आहेत.त्यांना भेट म्हणून ग्रामस्थांनी आश्रयासाठी दहा गुंठे जागा व एक नवी चारचाकी महींद्रा बोलेरो गाडी भेट दिली आहे.

## अमृताश्रम स्वामी महाराज यांना राज्यस्तरीय वारकरी भूषण पुरस्कार प्रदान

पुरस्कार संजय जी बालवडकर पुणे यांना ही पुरस्कार देण्यात आले या प्रसंगी सुभाष शेट शिरसागर , शेखर बुवा जांभुळकर , उदबोध महाराज पैठणकर, प्रसाद देव चासकर , जालिंदर वाबळे वासुंदेकर , पवन महाराज मध्यप्रदेश , विठ्ठल महाराज बहिर राजुरीकर , सागर वनगुजरे , डॉक्टर दिलीप उदगीरकर , अंकुश घोडके , मकरंद महाराज शास्त्री , वरद जोशी लिंबागणेशकर , दत्ता गुरु पोहेकर , नागेश कुलकर्णी , रामराजे राक्षसभवनकर, भूषणजी कावसानकर नगराध्यक्ष पैठण , बबन देव शिरसकर समस्त मुंदडा परिवार पैठण , अन्य नगरसेवक , समस्तनाथ वंशज व वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी माता भगिनी व अन्य पत्रकार उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

## लिंबागणेश येथील शिबिराला राजेंद्र मस्के यांची उपस्थिती

बीड दि ११(प्रतिनिधी)- छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान अंतर्गत बीड तालुक्यातील श्री क्षेत्र भालचंद्र संस्थान, लिंबागणेश येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनीआयोजित शिबिराला उपस्थित राहून नागरिकांच्या विविध महसुली अडचणी व समस्यांची माहिती घेतली.या शिबिराच्या माध्यमातून सातबारा, फेरफार, वारसा नोंद, उत्पन्न व रहिवासी दाखले यांसारख्या विविध कामांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या योजना व सेवा थेट गावपातळीवर उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम निश्चितच जनतेसाठी उपयुक्त ठरणार आहे.लिंबागणेश महसूल मंडळाच्या वतीने आयोजित या शिबिरास तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या तत्काळ सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला.


# पार्श्वभूमी


### सरकारने कितीही दावे केले तरीही इंधनाचा संकट दिसतंय-आवटे

बीड दि ११(प्रतिनिधी)- सर्व काही सुरळीत चालू आहे, आपल्याकडे डिझेल, पेट्रोल, गॅस याचे सर्व साठे पुरेसे आहेत, असे कितीही सरकारी दावे केले तरीही संकट दिसतं आहे ते घरापर्यंत आलं आहे. श्रीरंजन आवटे यांनी नमूद केले.युद्ध भडकल्यापासून घरगुती गॅस ६० रुपयांनी वाढला आहे.कमर्शियल गॅस ११५ रुपयांनी महागला यामुळे अनेक हॉटेल्स बंद करावी लागली आहेत.अगदी इडली, डोसा वगैरे बंद करा, इथपर्यंत चर्चा आली आहे आणि आपलं सरकार पॅनिक होऊ नका, म्हणून सांगतंय. मुळात धड माहितीच सांगितली जात नाही. पर्यायी उपाययोजना तर दूरच. तुम्ही युद्धावर मीम करत बसाते ऑल इज वेल च्या बाईट्स देतील पण उद्या खायचं काय?, हा प्रश्न पुढ्यात उभा राहील तेव्हा काय कराल? असा प्रश्न सोशल मीडियावरून श्रीरंजन आवटे यांनी विचारला आहे.



# दोन कारच्या धडकेत चिंचोली माळी येथील माजी सैनिकासह पाच जण जबर जखमी

चिंचोली माळी दि ११ (प्रतिनिधी)- केज-मांजरसुंबा महामार्गावरील उमरी पाटी व गंगामाऊली साखर कारखान्याजवळ दोन कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील माजी सैनिक यांच्यासह दोन्ही वाहनांतील एकूण पाच जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले अशी घटना मंगळवार रोजी दुपारी बाराच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहिती नुसार, मंगळवार दि.१० मार्च मंगळवार रोजी दुपारी सुमारे १२ च्या सुमारास हा अपघात घडला. तालुक्यातील चिंचोली माळी येथील माजी सैनिक मधुकर बालासाहेब गायकवाड हे



रिलायन्स पवन ऊर्जा कंपनीत सुरक्षा रक्षक सुपरवायझर म्हणून कार्यरत असून ते त्यांचे सहकारी सिद्धेश्वर आदमाने यांच्या सह स्विफ्ट डिझायर क्र. चक ४४ ड-७४३२ कारने बीड कडे जात होते. त्याच वेळी बीडकडून केजकडे येणाऱ्या टाटा अल्ट्रॉस क्र. चक २३ इक ६५६६ कारची आदित्य बिअर बार समोर स्विफ्ट डिझायर कारशी समोरा समोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रस्त्यावर काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती.या अपघातात शिवराज रविंद्र माने वय ३३ रा. बीड, रवि संतराम शिंदे वय ३३, रा. बीड, अनिल आत्माराम मोरे वय ३२, रा. बीड, सिद्धेश्वरदेवसन आदमाने वय २० रा. बीड व मधुकर बालासाहेब गायकवाड वय ५४ रा. चिंचोलीमाळी हे पाच जण जखमी झाले आहेत. सदरील अपघाताची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार, प्रल्हाद चव्हाण, जमादार गित्ते, संतोष गित्ते, शिवाजी कागदे व इतर कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिका चालक सुमित तेलंग यांच्या मदतीने जखमींना तातडीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास केज पोलीस करीत आहेत.

# ८० वर्षाच्या वयोवृद्ध आजीवर बलात्कार

### बलात्कार करणाऱ्याला फासावर चढवा- बी एम पवार

वडवणी दि १० (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील एका तांड्यावरील बंजारा समाजाच्या ८० वर्षे असलेल्या वयोवृद्ध आजीवर बलात्कार करणाऱ्या त्या नराधमाला फासावर चढवा अन्यथा राज्यभर आंदोलन केले जाईल असा इशारा सेवालाल सेना संस्थापक अध्यक्ष तथा ओबीसी नेते बी एम पवार यांनी दिला आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पुढे असे म्हटले आहे की, बंजारा समाजातील वयोवृद्ध आजीवर शेख रमजान याने घरात घुसून तिच्यावर बलात्कार केल्याची माणुसकीला आणि लोकशाहीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. त्यामुळे त्याला फाशीची शिक्षा ठोठावली पाहिजे यासाठी राज्य सरकारने हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा अशी मागणी करण्यात आली आहे.बंजारा समाजाच्या वयोवृद्ध आजीवर बलात्कार करणाऱ्या त्या नराधमाचा गुन्हा जलद गती न्यायालयात चालविण्यात आला नाही तर बंजारा समाज बांधव राज्यभर सरकारच्या विरोधात आंदोलन छेडेल याची नोंद राज्य सरकारने घ्यावी असा इशारा बी एम पवार यांनी दिला आहे. या पत्रकावर शरद चव्हाण, जीवन राठोड, पत्रकार नितीन चव्हाण,विलास राठोड, दिलीप राठोड,अजित चव्हाण,अमित राठोड,अमर राठोड, विलास चव्हाण, तुकाराम आडे, सुनील चव्हाण, दत्ता राठोड, आबासाहेब पवार, रोहिदास चव्हाण, अंकुश राठोड यांच्या सह अनेकांची नावे आहेत.

### ऊसतोड मजुरांसाठीची लाडकी बहीण योजना बंद पडलेली केवायसी साईट तात्काळ सुरू करा- नवनाथ धायजे

माजलगाव दि १० (प्रतिनिधी)-ऊसतोड मजूर कुटुंबांना लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळण्यात केवायसी साईट बंद असल्याने अडथळे येत आहेत.स्थलांतरित स्वरूपात काम करणाऱ्या या मजुरांना वेळेत कागदपत्रे पूर्ण करता येत नसल्याने अनेक लाभार्थी वंचित राहत आहेत.या पार्श्वभूमीवर केवायसी साईट तात्काळ सुरू करावी.तसेच ऊसतोड मजुरांसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत,अशी मागणी बहुजन विकास मोर्चाचे ज्येष्ठ नेते नवनाथ धायजे यांनी केली आहे.ऊसतोडीच्या हंगामात बीड जिल्ह्यातून हजारो मजूर कुटुंबांसह स्थलांतर करतात.त्यामुळे आधार, मोबाईल लिंक,बँक खाते अपडेट, ओटीपी खाते केवायसी करू शकत नाहीत.त्यातच शासनाने केवायसी साईट बंद केली आहे.यामुळे लाडक्या बहिणींना शासनाच्या लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळत नाही.साईट बंद असल्याने हजारो लाभार्थी वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. यामुळे गरीब कष्टकरी लाडक्या बहिणींचे आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर केवायसी साईट तात्काळ सुरू करावी,अशी ठाम मागणी धायजे यांनी केली आहे.

# अंभोरा येथे महिला दिन उत्साहात साजरा

अंभोरा दि ११ (प्रतिनिधी)- आष्टी तालुक्यातील अंभोरा येथे ग्रामपंचायत च्या वतीने विविध विकासकामांचे लोकार्पण व जागर स्त्री शक्तीचा - खेळ पैठणीचा कार्यक्रम आयोजित करून जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऐश्वर्याताई धस ह्या होत्या. सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त रामेश्वर थोरात, लेखक युनूस सय्यद, सरपंच सागर आमले, उपसरपंच दिपाली आमले, ग्रामविकास अधिकारी दिपक नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अंभोरा गावामध्ये विविध क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केलेल्या महिलांचा ग्रामपंचायतच्या वतीने नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्राथमिक शिक्षिका अनामिका शिंदे व कविता सोनवणे, आशा सेविका वर्षा गवळी, अंगणवाडी सेविका प्रिया रुद्राखे यांना मान्यवरांच्या हस्ते नारीशक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.ग्रामपंचायत संचलित सखी प्रेरणा भवनचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये सर्व महिलांसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व वापरून झालेले पॅड विल्हेवाट लावण्यासाठी स्मार्ट बर्नर स्थापित करण्यात आले आहे. सोबतच गावातील महिला स्वयंसहायता बचत गटातील महिलांच्या उत्पादन प्रक्रियेला गती मिळावी याकरिता ग्रामपंचायत तर्फे बंदिस्त जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.गावातील सर्व महिला करदात्यांना मोफत फवारणी पंपाचे वितरण करण्यात आले.मोफत तेल काढणी यंत्र व मोफत मिरची कांडप यंत्राचे लोकार्पण करण्यात आले.

# कोळशाचा ट्रक पलटून अपघातात ट्रक मधील दगडी कोळसा रस्त्यावर

### कोठारी यांची जखमीला मदत

जामखेड दि ११ (प्रतिनिधी)- शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर मोहा फाटा रोडवरच दगडी कोळशाचा ट्रक पलटी झाल्याने मोटरसायकल वरीलह गोपीनाथ विठोबा पठाडे वय ५५ राहणार हरिनारायण आष्टा हा पण जखमी झाला अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना श्रीकांत रेडे यांनी कळवतात त्यांनी आपली रुग्णवाहिका जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले.यासंदर्भात माहिती अशी की दगडी कोळशाचा १२ पीक्यू ७७९५ या क्रमांकाचा ट्रक आणि मोटरसायकल एम एच२३ व्हि ३६९७ हे मोटरसायकलला कोळशाचा ट्रक पलटून अपघातात दुचाकी वरील गोपीनाथ पठाडे हा जखमी झाल्याची माहिती समजल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी जामखेडचे पोलीस निरीक्षक यांना या अपघाताची माहिती कळवत आपली रुग्णवाहिका नेऊन यातील जखमींना रुग्णालयात दाखल केले दरम्यान यावेळी दीपक भोरे आणि ऋषिकेश शेळके यांनी मदत केलीबराच वेळ रोडवर दगडी कोळसा पडल्याने रहदारीस अडथळा झाला होता शेवटी क्रेन आणि जेसीबी रस्त्यावरील गाडी बाजूला घेऊन कोळसा बाजूला सरकून रहदारी चालू केली आहे जामखेड येथील पोलिसांनी त्वरीत मदत केली असे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी म्हणाले.




# मुख्यमंत्र्यांनी सातबारा कोरा करण्याचे आश्वासन पाळले नाही -राजेंद्र आमटे

बीड दि ११ (प्रतिनिधी)- विधानसभा निवडणुकी दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांचा ''सातबारा कोरा करू'' असे आश्वासन दिले होते. मात्र निवडून आल्यानंतर कर्जमाफीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यात आले त्यांनी आपले आश्वासन पाळले नाही.टीका शेतकरी हक्क मोर्चाचे कार्यकर्ते राजेंद्र आमटे यांनी केली आहे.

शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे मोठे शेतकरी आंदोलन झाले होते. त्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र ते आश्वासन प्रत्यक्षात पूर्ण झाले नाही, ही बाब दुर्दैवी असल्याचे आमटे यांनी म्हटले आहे.नागपूर येथील आंदोलनानंतर अनेक बँकांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्यासाठी ''कर्ज नवे-जुने'' करण्याची मोहीम राबवली. नवे-जुने केले तरी कर्जमाफीचा लाभ मिळेल असे खोटे आश्वासन देऊन अनेक शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणारे ५० हजार रुपयांचे अनुदान अपुरे असल्याचे सांगत ही रक्कम २ लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. याबाबत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, शेतकरी नेते बाळासाहेब मोरे पाटील, युवा शेतकरी नेते अशोक ढोले पाटील, शेतकरी पुत्र संदीप नवले, खाजा भाई पठाण, नजीब भाई, राजू वीर, अर्जुन सोनवणे आदी उपस्थित होते.

# नगरसेवक पती जखीउद्दिन सौदागर यांनी काडला वॉर्ड क्र. ६ मधील वीज प्रश्न निकाली

?बीड दि ११ (प्रतिनिधी)- शहरातील वॉर्ड क्रमांक ६ मध्ये गेल्या काही दिवसांपासून सातत्याने खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. या समस्येची दखल घेत नगरसेवक जखीउद्दिन सौदागर यांनी केवळ तक्रार करून न थांबता, स्वतः उपस्थित राहून विद्युत कर्मचाऱ्यांसोबत कामात सहभाग घेतला आणि वीज पुरवठा सुरळीत केला. वॉर्ड क्रमांक ६ मधील काही भागात तांत्रिक बिघाडामुळे वारंवार पावर कट होत होता. कडक उन्हाळा आणि घरगुती कामात येणाऱ्या अडचणींमुळे स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला होता. नागरिकांनी ही समस्या नगरसेवक सौदागर यांच्या कानावर घातली. तक्रार प्राप्त होताच सौदागर यांनी महावितरणच्या कर्मचाऱ्यांना पाचारण केले. मात्र, कामाचा व्याप आणि तांत्रिक गुंतागुंत पाहता, त्यांनी स्वतः घटनास्थळी थांबण्याचा निर्णय घेतला. भर उन्हात कर्मचाऱ्यांसोबत उभे राहून त्यांनी कामाचा आढावा घेतला. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना कामात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी स्थानिक पातळीवर मदत उपलब्ध करून दिली. काम सुरू असताना नागरिकांना संयम राखण्याचे आवाहन करत त्यांनी तातडीने प्रश्न मार्गी लावला. नागरिकांची गैरसोय होऊ नये ही माझी प्राथमिकता आहे. वीज कर्मचाऱ्यांना काही तांत्रिक अडचणी येत होत्या, त्या सोडवण्यासाठी मी स्वतः तिथे उपस्थित राहिलो. आता वॉर्डातील विद्युत पुरवठा सुरळीत झाला आहे.



# तक्रारदाराला मानसिक त्रास देऊन ठाण्यामधून हाकलून दिले वडवणी ठाण्याच्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी- सरवदे

बीड दि ११ (प्रतिनिधी) वडवणी पोलीस स्टेशन अंतर्गत एका गंभीर प्रकरणात तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा प्रकरणात कॉन्स्टेबल तांदळे व पोलीस निरीक्षक वर्षा वघाडे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्याकडून करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, वडवणी तालुक्यातील खंडोबाची वाडी येथील एका व्यक्तीची पत्नी त्याच्या भाच्याने पळवून नेल्याचा आरोप आहे. इतकेच नव्हे तर त्या महिलेसोबत संबंधित व्यक्तीच्या दोन मुलींनाही जबरदस्तीने घेऊन गेल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पीडित व्यक्ती वडवणी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी गेला असता, पोलिसांनी त्याची तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.याच प्रकरणात कॉन्स्टेबल तांदळे यांनी पळून गेलेल्या महिलेशी फोनवर संपर्क साधल्याची कॉल रेकॉर्डिंग समोर आली असून त्यामध्ये ''पोलिस स्टेशनला लवकर ये, त्यांनी अर्ज दिला आहे, तुझा जबाब घ्यायचा आहे'' असे सांगितल्याचे बोलणे ऐकू येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे पोलिसांकडून तक्रारदाराला मदत करण्याऐवजी पळून गेलेल्या महिलेलाच मदत केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.तसेच तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, तो पोलीस स्टेशनमध्ये गेला असताना त्याला मानसिक त्रास देत तेथून हाकलून लावण्यात आले. या प्रकरणात पोलीस निरीक्षक वर्षा वघाडे यांचाही सहभाग असल्याचा आरोप करण्यात येत आहे.या प्रकरणात कॉन्स्टेबल तांदळे यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (उऊ) तपासण्याची तसेच पोलीस निरीक्षक वर्षा वघाडे व संबंधित कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच पीडित व्यक्तीची तक्रार तात्काळ नोंदवून घेऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही वंचितचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

# बीड येथे सनदी लेखापाल, प्रमाणित लेखा परीक्षक प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड दि ११(प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म. पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने बीड येथे जिल्ह्यातील सहकार विभागाचे पॅनेल वरील सनदी लेखापाल, प्रमाणित लेखा परीक्षक सहकारी संस्था यांच्या करीता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न झाले.यावेळीकार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा उप निबंधक सतीश तोटावर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आले. यावेळी बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापक आर.व्ही. उबाळे यांची उपस्थिती होती. दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात जिल्हा उपनिबंधक सतीश तोटावर, आदेश नहार, सनदी लेखापाल बीड सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे प्राचार्य बी.जे. ठोंबरे, उप प्राचार्य एस. आर. कोळे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. समारोप प्रसंगी शिवराज नेहरकर सहाय्यक निबंधक सहकारी संस्था केज यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्र संचलन आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस. आर. कोळे उप प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.

# अ. भा.मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन उदगीर येथे होणार

बीड दि ११(प्रतिनिधी)-अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन १८ आणि १९ एप्रिल रोजी लातूर जिल्ह्यात उदगीर येथे होत असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख आणि अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी आज येथे केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होत असून बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे राजे भोसले स्वागताध्यक्ष असणार आहेत.परिषदेच्या एका शिष्टमंडळाने अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, स्थानिक आमदार संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना अधिवेशनास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याची विनंती केली.. मुख्यमंत्र्यांनी परिषदेची विनंती मान्य केली असून ''मी नक्की येतो'' असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.. मुख्यमंत्र्यांना आज भेटलेल्या शिष्टमंडळात परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, परिषदेचे लातूर विभागीय सचिव तथा अधिवेशनाचे प्रमुख संयोजक सचिन शिवशेट्टे, सातारा जिल्हा अध्यक्ष हरिष पाटणे, मुंबई अध्यक्ष राजा आदाटे, संयोजन समितीचे युवराज धोतरे आदि होते.यंदाच्या अधिवेशनास देशभरातून ३ हजार पत्रकार येतील असा अंदाज असून त्यादृष्टीने व्यवस्था करण्यात येत आहे.. अधिवेशनाच्या उदगीर येथील कार्यालयाचे उद्घाटन देखील नुकतेच एस.एम.देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या अधिवेशनास मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याचं आवाहन स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, लातूर विभागीय सचिव तथा प्रमुख संयोजक सचिन शिवशेट्टे, संभाजीनगर विभागीय सचिव रवी उबाळे, संयोजन समितीचे युवराज धोतरे आदिंनी केले आहे..

### लिंबागणेश येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर उत्साहात संपन्न

लिंबागणेश दि.११(प्रतिनिधी): राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान (टप्पा-१) अंतर्गत लिंबागणेश येथे आज दि.११ बुधवार रोजी आयोजित करण्यात आलेले महाराजस्व समाधान शिबिर नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाले.लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान सभामंडपात आयोजित या शिबिरात शेतकरी, ग्रामस्थ, महिला बचत गट, विद्यार्थी तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला.या अभियानाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) शैलेश सूर्यवंशी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमास राजेंद्र मस्के, बळीराम गवते, डॉ. गणेश ढवळे, गोरखनाथ सिंगर यांच्यासह महसूल विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये निवासी नायब तहसीलदार सुहास हजारे, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, निवडणूक नायब तहसीलदार सुरेंद्र डोके, नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे, पुरवठा निरीक्षक प्रशांत सुपेकर, उपाधीक्षक भूमी अभिलेख अनिल शिवणकर, आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे सय्यद शरिफभाई यांच्या वतीने जि प शाळेतील विद्यार्थ्यांना ड्रेसचे वाटप

केज दि ११(प्रतिनिधी)-शहरातील अजिजपूरा मोहल्ला भागातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक उर्दू शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना पवित्र रमजान महिन्यातील रमजान ईद साजरी करण्यात यावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सय्यद शरिफभाई यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करून कपडे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सय्यद शरिफभाई, सेवा निवृत्त मुख्याध्यापक अमजद सर, जेष्ठ पत्रकार मजहर भाई शेख, संपादक खतीब मुब्बशिरोद्दीन, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष खुरेशी ताहेरभाई, जेष्ठ नागरिक सय्यद अहेमदभाई, जेष्ठ शिक्षक खतीब मियांभाई सर, तसेच शाळेतील शिक्षक खतीब अफजलोद्दीन सर, फारोखी कामथाने सर, मोहम्मद इलियास सर, अन्सार शहा सर, श्रीमती दाईमी मॅडम आदि उपस्थित होते.



# नाथपरंपरेमध्ये भगवानगडाला सर्वात महत्वाचे स्थान-कृष्णा महाराज शास्त्री

पैठण दि ११(प्रतिनिधी)-शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचे श्रीगुरु संत जनार्दन स्वामी यांचा जन्म, अनुग्रह आणि नाथांनी आपला देह गंगार्पण केलेली तिथी म्हणजेच फाल्गुन वद्य षष्ठी होय. या विशेष तिथीलाच नाथषष्ठी असे म्हणतात. नाथांच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडी या तिथीलाच घडल्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये या तिथीला अनन्य साधारण महत्व आहे. नाथांच्या प्रती असलेली कृतज्ञता अभिव्यक्त करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभरातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या या तिथीला पैठणला येतात. या सोहळ्यामध्ये भगवानगडाची दिंडीसुद्धा एक महत्त्वाची दिंडी असल्यामुळे वै.श्री संत भगवानबाबांपासून भगवानगडाच्या दिंडीला विशेष मान आहे. असे प्रतिपादन भगवान गडाचे उत्तर अधिकारी कृष्णा महाराज शास्त्री यांनी केले. भगवानगडाहून निघाल्यापासून हजारो भाविक या दिंडीमध्ये सहभागी झाले होते. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यावर फाल्गुन वद्य षष्ठी व सप्तमी हे दोन दिवस भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या नामाचा जयघोष झाल्यानंतर परंपरेप्रमाणे अष्टमीच्या दिवशी ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या आदेशानुसार भगवानगडाचे चतुर्थ उत्तराधिकारी ह.भ.प.श्री. कृष्णा महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने नाथषष्ठी सोहळ्याची सांगता झाली. यावेळी महाराजांनी सांगितले की, अभंग हे नामपर, उपदेशात्मक, स्थितीपर, आदेशपर, मागणीपर असतात. परंतु गौळण ही भक्ती व प्रेम रसाने परिपूर्ण असते. यावेळी कृष्णा महाराज शास्त्रीजींनी श्री संत एकनाथ महाराज यांच्या पूर्वजापासून सर्वांच्या जीवनावर माहिती दिली. यावेळी कृष्णा महाराज शास्त्रीजींनी भगवानगडाच्या दिंडीबद्दल बोलताना सांगितले की, नाथषष्ठीला मराठवाड्यातून पहिली दिंडी ही श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेली आहे. तेव्हापासून श्री क्षेत्र भगवानगडाच्या दिंडीला नाथपरंपरेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित हजारो भाविकांना शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा महाप्रसाद देण्यात आला व नाथषष्ठी सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# संपादकीय

## वर्षअखेर बुडबुडे फुटणारा अर्थसंकल्प!

अर्थसंकल्पात अनेकदा मोठमोठ्या घोषणा होतात, पण त्या प्रत्यक्षात किती पूर्ण होतात, हा खरा प्रश्न आहे. महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी (६ मार्च २०२६) सादर केला. त्यात शेतकरी कर्जमाफी, वीज बिल सवलत, लाडकी बहीण योजना कायम ठेवणे, चौथी मुंबई, एआय गावे अशा अनेक मोठ्या घोषणा आहेत. पण हे सगळे शब्दांचे बुडबुडे वाटतात. हे शब्दांचे बुडबुडे फुटण्याची वर्षभर वाट पाहायची. पुढच्या वर्षी पुन्हा असाच शब्दबंबाळ अर्थसंकल्प येईलच ! महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच एखाद्या मुख्यमंत्र्यांनी स्वतः अर्थसंकल्प सादर केला, हे निश्चितच ऐतिहासिक आहे. ६ मार्च २०२६ रोजी विधानसभेत मांडलेल्या या अर्थसंकल्पाला अजित पवारांच्या निधनानंतरची पार्श्वभूमी आणि महायुती सरकारच्या आर्थिक शिस्तीच्या दाव्याची छाया आहे. एकूण खर्च सुमारे ७.६९ लाख कोटी रुपये, महसूल तूट ४० हजार ५५२ कोटी, फिस्कल तूट १.५० लाख कोटी आणि राज्याची अर्थव्यवस्था ७.९% ने वाढण्याचा अंदाज हे आकडे ऐकून वाटते की महाराष्ट्र विकसित होण्याच्या दिशेने धावतोय. पण जरा खोलात उतरलो तर हे शब्दांचे बुडबुडे वाटतात, कारण घोषणांच्या मागे अंमलबजावणीची ठोस यंत्रणा, निधीची हमी आणि दीर्घकालीन टिकण्याची शाश्वतता दिसत नाही. अर्थसंकल्पातील सर्वाधिक चर्चित घोषणा म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना अंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकीदार शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी आणि नियमित परतफेड करणाऱ्यांना ५० हजार प्रोत्साहन. तसेच ७.५ हॉर्सपॉवर पंपधारक शेतकऱ्यांसाठी २० हजार कोटी रुपयांची वीज बिल माफी वा सबसिडी. ही घोषणा निवडणुकीपूर्वीच्या आश्वासनांची पुनरावृत्ती आहे. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनांमध्येही लाखो शेतकरी अपात्र ठरले, प्रक्रिया लांबली आणि पूर्ण रक्कम मिळाली नाही. महावितरण आधीच आर्थिक तंगीत आहे! २० हजार कोटींची सबसिडी कशी आणि कधी देणार? शेतकरी आत्महत्या, दुष्काळ, बाजारभाव कोसळणे या मूळ समस्या सोडवण्यासाठी ठोस उपाय जसे कृषी उत्पन्न हमी, बाजार सुधारणा, सिंचन प्रकल्पांची गती यांचा पत्ता नाहीच. फक्त माफी आणि सवलत म्हणजे शेतकऱ्यांना मतदार म्हणून खुश ठेवणे, विकास नव्हे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कायम ठेवली जाईल आणि त्यासाठी तरतूद केली जाईल, असे सांगितले. गेल्या वर्षी ही योजना ४०-५० हजार कोटी खर्च करत आहे. ही योजना आर्थिकदृष्ट्या टिकावू नाही. राज्याची महसूल तूट वाढत आहे (२०२५-२६ मध्ये ०.९% जिएसडीपी ), अशा योजनांमुळे भांडवली खर्च (दळणवळण, शिक्षण, आरोग्य) कमी होतो. त्यात हा महिलांना पैसे देऊन मतं घेणे असला प्रकार! प्रत्यक्षात महिला बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य सुविधा यावर गुंतवणूक करायला हवी . योजना चालू ठेवणे म्हणजे आर्थिक शिस्तीचा ढोंग नव्हे काय? हे खरे सशक्तीकरण नव्हे. त्यात वाढीव २१०० देणार होते त्याचा विसर सगळ्यांनाच पडलाय! का ते पण निवडणुकीपुरते गाजर होते? ग्राम सडक योजना, पी एम ए वाय - ग्रामीण , चौथी मुंबई (वाढवण), संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट, एकनाथ शिंदेंच्या गावात निसर्गोपचार केंद्र, एआय गावे (७५ गावांत पायलट), नैसर्गिक शेती अभियान, मत्स्यसंपदा योजना. हे सगळे रोडमॅप २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे आहेत, पण प्रत्यक्षात असे प्रकल्प जमीन अधिग्रहण, पर्यावरण मंजुरी, निधी विलंब यात अडकतात. गेल्या १० वर्षांत अनेक मेगा प्रोजेक्ट (मेट्रो, समृद्धी महामार्ग पूर्ण टप्पे) रखडले आहेत. एआय गावे ही फक्त फॅशनेबल घोषणा आहे कारण ग्रामीण भागात इंटरनेट, वीज, शिक्षणाच्या मूलभूत सुविधा नाहीत, तर एआय काय करणार? हे कागदावरचे विकास आहेत. फडणवीस म्हणतात फिस्कल तूट ३% खाली, महसूल तूट १% खाली. जीएसडीपी ५१ लाख कोटी, दरडोई उत्पन्न ३.४७ लाख. हे आकडे कागदावर चांगले, पण लोकप्रिय योजनांमुळे (लाडकी बहीण, कर्जमाफी) भांडवली खर्च कमी होतो. राज्याचे कर्ज आधीच नऊ लाख कोटी पार झालेय. व्याज भरण्यासाठी मोठा भाग खर्च होतो. केंद्राकडून मिळणारी देवाणघेवाण वाढली (९८ हजार ३०६ कोटी), पण स्वतःचा महसूल वाढवण्याचे टॅक्स सुधारणा, जीएसटी संकलन उपाय नाहीत. आर्थिक सर्वेक्षणात ७.९% वाढ दाखवली, पण महागाई, बेरोजगारी, ग्रामीण स्थलांतर याकडे दुर्लक्ष झाले आहे. अर्बन हेल्थ डिपार्टमेंट स्थापना, शिक्षण-कौशल्य विकासावर भर, पर्यटन सर्किट पण तरतुदी कमी. अजित पवार स्मारक, गतिमान नागरी सेवा पुरस्कार हे राजकीय आहेत. शिक्षणात ड्रॉपआउट, आरोग्यात डॉक्टर-रुग्ण प्रमाण कमी; यावर ठोस निधी नाही. पर्यटन, संस्कृती यांना स्मारक देऊन राजकीय लाभ घेणे सोपे, पण रोजगार निर्मिती नाही. हा अर्थसंकल्प लोकप्रिय घोषणा आहे. शेतकरी, महिला, ग्रामीण मतदारांना आकर्षित करणारा आहे. नवीन योजना कमी, जुन्या कायम ठेवल्या. आर्थिक शिस्तीचा दावा असला तरी लोकप्रिय खर्च वाढतोय. ६-१२ महिन्यांत पुरवणी मागण्या, अंमलबजावणी अहवाल यातून खरे चित्र दिसेल. सध्या हे शब्दांचे बुडबुडे वाटतात चमकदार, पण फुटण्याची शक्यता जास्त.

# शाळेची बदनामी करणाऱ्या विरुद्ध कारवाई करा

## शालेय व्यवस्थापन समितीची मागणी



केज, दि. ११ (प्रतिनिधी)- तालुक्यातील साळेगाव जि प केंद्रीय प्राथमिक शाळेची वैयक्तिक हेव्या, दाव्यातून बदनामी करणाऱ्या विरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षासह, समितीच्या सर्व सदस्यांनी मुख्य कार्यकरी अधिकारी, बीड यांच्याकडे निवेदणाद्वारे केली आहे.साळेगाव येथील जि प केंद्रीय प्राथमिक शाळेची निवड पी एम श्री योजनेसाठी झाली आसून, शासनाने या योजनेतून विद्यार्थी व शाळेला मोठया प्रमाणात सोई, सुविधा व निधी उपलब्ध करून दिलेला आहे. शाळेचे मुख्याध्यापक सुरेश काळे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य विद्यार्थ्यांच्या हिताचे उपक्रम राबवित आहेत. आसे आसताना धारूर तालुक्यातील एका तक्रारदाराने वैक्तिक हेव्या, दाव्यातून शाळेसह मुख्याध्यपाकाच्या विरोधात खोटे, नाटे आरोप करून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन शाळेची, मुख्याध्यापकाची व व्यवस्थापन समितीची बदनामी चालविली आहे. आशा खोट्या आरोप करणाऱ्या विरुद्ध कारवाई करावी. अशी मागणी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सविता नितीनराव सरवदे यांचेसह सर्व सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांच्याकडे निवेदणाद्वारे केली आहे. निवेदनावर सर्व १० सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शालेय मुलामुलींचा बालविवाहास विरोध करण्याचा संकल्प



नांदेड दि ११(प्रतिनिधी)- जिल्ह्याला बालविवाह मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली 'बालविवाह मुक्त भारत अभियान' राबवण्यात येत आहे. याअंतर्गत मुक्तीरथाद्वारे जनजागृती, स्वाक्षरी मोहीम आणि १०० दिवसांचे विशेष उपक्रम राबवून प्रशासनातर्फे कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत. जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक गंगाधर ढवळे आणि शिक्षकांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृतीदिनाचे औचित्य साधत शाळेत शिकणाऱ्या मुलामुलींकडून व त्यांच्या पालकांकडून मुलींसाठी १८ आणि मुलांसाठी २१ वर्षे वयापर्यंत बालविवाह न करण्याचे चक्क प्रतिज्ञापत्रच भरुन घेतले आहे. जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यात बालविवाह होवू नये यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार १०० दिवसांचे विशेष अभियान राबवून गावपातळीवर ग्रामपंचायतींद्वारे बालविवाह प्रतिबंधक ठराव मंजूर केले जात आहेत. बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ नुसार वय १८ वर्षांखालील मुलीचे किंवा २१ वर्षांखालील मुलाचे लग्न रोखण्यासाठी प्रशासन कठोर पावले उचलत आहे. अल्पवयीन मुला-मुलींचे लग्न लावू नयेत; ते केल्यास काय शिक्षा होवू शकते, हे सर्वांना माहिती पाहिजे. यासाठी कायदयाची जनजागृती व प्रबोधन करण्यावर भर द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिल्या आहेत. या अंतर्गत शाळेतील मुलांसाठी घेण्यात येर्णाया विविध कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, प्राथमिक पदवीधर शिक्षिका संगिता बडवणे, विषय शिक्षक उमाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय वयातच बालविवाहाविरोधी योग्य संस्कार होण्यासाठी शाळेतील मुलामुलींकडून व त्यांच्या पालकांकडून दोन टप्प्यांत बालविवाह विरोधात प्रतिज्ञापत्र लिहून घेतले आहे.

# सावता परिषद नांदेडच्या वतीने सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



नांदेड दि ११(प्रतिनिधी)- सावता परिषद नांदेड जिल्हा शाखेच्यावतीने दि.१० मार्च २०२६ मंगळवार रोजी सकाळी ठिक ९ वाजता सावित्रीबाई ज्योतीराव फुले पुर्णाकृती पुतळा आयटीआय चौक नांदेड येथे सावता परिषद, माळी महासंघ, समता परिषद व पिछडा शोषित संघटना नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानज्योती, राष्ट्रमाता, पहिल्या मुख्याध्यापीका, विद्येची जननी, थोर समाजसेविका, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या स्मृती दिनानिमित्त सर्व मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या अभिवादन कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड यांनी प्रास्तावना मांडून आपले मनोगत व्यक्त केले.तर भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या महान कार्याची दखल घेवून त्यांना मरणोपरांत भारतरत्न पुरस्कार देण्याचीही मागणी त्यांनी यावेळी सावता परिषदेच्या वतीने केंद्र सरकारकडे केली. यावेळी ज्येष्ठ नेते रामचंद्र रासे अण्णा, ओबीसीचे ज्येष्ठ नेते सटवाजी माचनवार, बालाजी थोटवे, सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष गोरखनाथ राऊत, सावता परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष सुनिल शिंदे, पिछडा शोषित संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष सतीशचंद्र शिंदे, शंकर सोनवणे, मारोती लुटे, सोनाजी राऊत, प्रा.मारोती शितळे, श्रीमंत राऊत, बालाजी बनसोडे, मारोती राऊत, दादाराव गडगीळे, गोपाळराव गडगीळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शिव जन्मोत्सवानिमित्त बालाघाट रत्न पुरस्कार सोहळा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

मांजरसुबा दि ११(प्रतिनिधी)- बालाघाट प्रतिष्ठानच्या वतीने बालाघाटावर प्रथमच छत्रपती शिवाजी



महाराजांच्या शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भव्य दिव्य अशी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. तसेच या सोहळ्यामध्ये बालाघाटावरील २०२५ मध्ये जे युवक, युवती शासकीय सेवेमध्ये रुजू झाले आहेत अशांचा बालाघाट रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. दिनांक १४ मार्च २०२६ रोजी बालाघाट व परिसरातील पाली, मांजरसुंबा, लिंबागणेश, उदंडवडगाव, रौळसगाव, चौसाळा, जेबा पिंपरी, येळंब, मराठी कन्या नेकनूर, विठ्ठल पेठ नेकनुर आदि केंद्राअंतर्गत येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी १ ते५, ५ ते ८, ९ ते १२ अशा गटामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. यामध्ये प्रथम पारितोषिक ३१०० रुपये प्रमाणपत्र आणि चषक, द्वितीय पारितोषिक २१०० रुपये प्रमाणपत्र व चषक, तृतीय पारितोषिक १हजार १०० रुपये प्रमाणपत्र व चषक आणि उत्तेजनार्थ दोन ५०१ रुपये प्रमाणपत्र व चषक, असे प्रत्येक गटातून बक्षीस दिले जाणार आहे. तरी बालाघाट व परिसरातील प्रत्येक शाळेतील प्रत्येक गावातून या गटातून विद्यार्थ्यांचा सहभाग घ्यावा आणि बालाघाटावर प्रथमच होत असणारा भव्य दिव्य अशा विचाराच्या शिवजयंतीचा उत्सव थाटात संपन्न करावा. वक्तृत्व स्पर्धेची वेळ सकाळी ९:४५ ते दुपारी ४ अशी आहे. वक्तृत्व स्पर्धा संपल्यानंतर लगेचच या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ व सहभाग नोंदवल्याबद्दल प्रमाणात पत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. मान्यवरांच्या हस्ते यांचा सन्मान होईल तसेच २०२५ मध्ये बालाघाटावरील जे युवक, युवती शासकीय सेवेमध्ये रुजू झालेले आहेत अशा युवक युवतींचा बालाघाट रत्न पुरस्कार मान्यवरांचे हस्ते देऊन सन्मान केला जाणार आहे. या सन्मान सोहळ्यासाठी ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभ हस्ते, डॉक्टर ज्योतीताई मेटे, तहसीलदार शेळके,सत्येंद्र पाटील सर,समंदर खान सर, श्रीमती गंगाखेडकर मॅडम, धर्मराज रसाळ सर आणि राहुल उंडाळे सर इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे.तरी बालाघाट व परिसरातील प्रत्येक गावातील शिवप्रेमी मान्यवर मंडळीने या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

# वंजारवाडी येथील कानिफनाथ यात्रेस आज प्रारंभ

बीड दि ११(प्रतिनिधी)-तालुक्यातील आदर्शगाव वंजारवाडी येथे ग्रामदैवत चैतन्य श्री. कानिफनाथ महाराजांचा यात्रा महोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. तेव्हा १२ मार्च रोजी भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

परंपरेनुसार, पूर्वी गावातील एका भक्ताला श्री. कानिफनाथ महाराजांच्या मढी येथील समाधीस्थळी दर्शन घेत असताना देवाचा साक्षात्कार झाला. मी तुझ्यासोबत येणार आहे असा संकेत मिळाल्यानंतर तो भक्त गावात परत आला. गावात आल्यानंतर सध्याच्या मातोश्री विद्यालयाच्या उत्तरेस देव गुप्त झाल्याचे मानले जाते. त्यानंतर गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात गावात श्री. कानिफनाथ महाराजांचे भव्य मंदिर उभारून चैतन्य कानिफनाथ महाराजांची प्राणप्रतिष्ठा केली. तेव्हापासून हा यात्रा महोत्सव मोठ्या श्रद्धा व भक्तिभावाने साजरा केला जात आहे. यंदाही आदर्शगाव वंजारवाडीचे सरपंच वैजिनाथ नाना तांदळे व ड. सर्जेराव तात्या तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. चैतन्य श्री. कानिफनाथ महाराजांची यात्रेची सुरुवात दि. ११ मार्च (बुधवार) रोजी सुरू झाली. तर दि. १२ मार्च (गुरुवार) रोजी मुख्य यात्रा होणार आहे. याच दिवशी संध्याकाळी ठीक ८ वाजता महाराष्ट्र लोकगीतांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तर दि. १३ मार्च (शुक्रवार) रोजी यात्रेची सांगता होणार आहे. यात्रेनिमित्त गावातील तसेच परिसरातील सर्व भाविक भक्तांनी उपस्थित राहून दर्शनाचा तथा कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच वैजिनाथ नाना तांदळे यांनी केले आहे.

# नागरिकांच्या तक्रारी येताच नगरसेविका पती नागरगोजे यांनी बंद पडलेले बोर तात्काळ सुरू

परळी दि.११(प्रतिनिधी)- परळी शहरातील प्रभाग क्रमांक ४ मध्ये काही नविन व दीर्घकाळापासून बंद पडलेले बोरवेल तात्काळ दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी. नवनिर्वाचित नगरसेविका सौ. मीरा केशव नागरगोजे यांच्याकडे नागरिकांनी केली होती याची दखल घेऊन नागरगोजे यांनी बंद पडलेले बोर चालू केले.

पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई पापा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील मूलभूत सुविधांवर भर देण्यात येत आहे. स्वच्छता मोहीम, रस्त्यावरील दिवाबत्ती, नाल्यांची साफसफाई यासह नागरिकांना दररोज भेडसावणाऱ्या पाण्याच्या समस्येवरही तत्काळ उपाययोजना करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, धनगर गल्ली, उखळवेस गल्ली, गवंडी गल्ली तसेच भीमनगर परिसरातील बंद पडलेले बोरवेल दुरुस्त करून त्यावर पाईपलाईन व नळ वाल बसवण्यात आले. त्यामुळे या भागातील नागरिकांना पुन्हा नियमित पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. नगरसेविका सौ. मीरा केशवराव नागरगोजे यांच्या पुढाकारामुळे प्रभागातील पाण्याची समस्या मार्गी लागल्याने स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानले असून भविष्यातही प्रभागाचा विकास अशाच प्रकारे सुरू राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



# भाषा,संस्कृती व ज्ञानाचा विकास करण्यासाठी अनुवाद महत्त्वाचे क्षेत्र-प्रा.डॉ.राऊत

गढी दि.१०(प्रतिनिधी)- गेवराई तालुक्यातील गढी येथील श्री शिवाजीराव पंडित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, इंग्रजी विभाग,व द इंग्लिश एज्युकेटर्स सोसायटी च्या वतीने 'पदवी स्तरावर अध्ययन व अध्यापनात अनुवादाचे महत्व' या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. सुनिल राऊत इंग्रजी विभाग प्रमुख, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज जि.बीड हे होते. कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून जयभवानी महाविद्यालय पाटोदाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते. तर अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते.प्रा डॉ. सुनिल राऊत आपल्या यांनी मार्गदर्शनात भाषेचा, संस्कृतीचा व ज्ञानाचा विकास होण्यासाठी अनुवाद हे किती महत्त्वाचे साधन आहे याचे सखोल असे मार्गदर्शन केले. शिक्षकासाठी भाषेवर प्रभुत्व असणे ही किती महत्त्वाची गोष्ट आहे, असे नमूद करून त्यांनी आपल्या मार्गदर्शनात विविध प्रकारच्या अनुवादित पुस्तकांची उदाहरणे दिली. भाषांतर केवळ एवढ्यावरच थांबते असे नाही तर भाषा, अर्थ व भावनात्मक वातावरणाचाही एक नव्याने, नव्या रसिकांसाठीची ती नवनिर्मितीच असते असेही डॉ. सुनिल राऊत यांनी सांगितले. कार्यशाळेचे उद्घाटक प्राचार्य पोफेसर सरकटे सदाशिव यांनी बोलताना कौशल्य विकसित केल्यासच येणाऱ्या काळात आपला निभाव लागेल. त्यासाठी येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांनी अधिकाधिक कौशल्याभिमुख व्हावे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी अध्यक्षिय समारोप केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. इनामदार तबस्सुम यांनी केले व आभार प्रा. डॉ. संतोषकुमार यशवंतकर यांनी मांनले.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात

बीड दि ११ (प्रतिनिधी)- शहरातीलसौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. १० मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त महिला कक्ष अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने साहित्य क्षेत्रातील महिलांचे योगदान आणि महिलांची आरोग्य व काळजी या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

याकार्यक्रमाचे उद्घाटन नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे , डॉ. विश्वंभर देशमाने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. सुधाकर गुट्टे यांनी महिलांनी आज सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेली असून असे कोणतेही क्षेत्र नाही कीत्यामध्ये महिला सहभागी नाहीत. स्त्री व पुरुष समान आहेत असे प्रतिपादन केले. महिलांचे आरोग्य व काळजी याविषयावर प्रमुख अतिथी प्रो. डॉ. वर्षा कुलकर्णी यांनी मार्गदर्शनपर केले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी केला.या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. ज्योती क्षीरसागर, डॉ. संध्या जोगदंड, डॉ. अनिता वैद्य, डॉ. वंदना फटाले, डॉ. पल्लवी इरलापल्ले, डॉ. सोनाली गावारे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दुष्यंता रामटेके यांनी केले तर आभार डॉ. मंजुषा जाधव यांनी मानले.

# कुंबेफळ येथील जि.प.उच्च प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिन साजरा

कुंबेफळ दि ११ (प्रतिनिधी) - जागतिक महिला दिना निमित्त तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची या शाळेत जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरुवातीसआदर्श राजमाता जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रातिनिधिक स्वरूपात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. शालु विजय थोरात, सौ. निर्मलामधुकर थोरात, विमल अभिमान पटेकर, फातेमा पठाण, अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी प्रास्ताविकात सांगितले. प्राथमिक पदवीधर डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर, गणित विज्ञान विषयाचे प्राथमिक पदवीधर शिक्षक संदीप मेघराज ठोंबरे सर, राहुल बजरंग बचुटे सर आकाश दत्तात्रय लोंढे सर, आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, ट्रेनी



शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम यांनी जागतिक महिला दिना निमित्त सविस्तर माहिती दिली. गावातील कर्तृत्ववान, आदर्श महिलांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. संगीत खुर्ची, गीत गायन, उखाणे, बेटी बचाव बेटी पढाओ असे विविध उपक्रम शाळेत घेण्यात आले. बालविवाह प्रतिबंधक शपथ घेऊन बालविवाह प्रतिबंधक बाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. शालु विजय थोरात, सौ. निर्मलामधुकर थोरात, सौ. सुवर्णमाला नानासाहेब पवार, सौ. अनिता सिध्देश्वर पवार, सौ. नंदिनी अविनाश थोरात, राधा संतोष ढोरे, विमल अभिमान पटेकर, फातेमा पठाण, मिरा सुरेशथोरात, अंगणवाडी ताई उषाताई थोरात, मदतनीस, पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार, गावातील बचत गट महिला, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

# ३ एप्रिलपासून बीडमध्ये राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

## विविध मान्यवरांच्या हस्ते होणार उद्घाटन; कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती

**बीड (प्रतिनिधी) मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, नव्या संशोधनाची माहिती आणि विविध कृषी उत्पादनांची ओळख व्हावी या उद्देशाने किसान कृषी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. याच परंपरेत यावर्षी प्रथमच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहावरून ३ ते ६ एप्रिल दरम्यान बीड येथे भव्य राज्यस्तरीय ''किसान कृषी महोत्सव'' आयोजित करण्यात आला आहे.**



छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल (मल्टी पर्पज ग्राउंड) बीड येथील विस्तीर्ण मैदानावर चार दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक व कृषीभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.किसान कृषी विकास प्रतिष्ठान गेल्या १८ वर्षांपासून मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कृषी प्रदर्शनांचे आयोजन करत आहे. गेवराई, जालना, परभणी, हिंगोली यांसह अनेक ठिकाणी झालेल्या या प्रदर्शनांना शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आग्रहानुसार यंदा बीड येथे या कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कृषी प्रदर्शनात प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन तसेच ओंकार साखर कारखाना समूह यांचा विशेष सहभाग राहणार आहे.प्रदर्शनामध्ये आठ भव्य दालनांद्वारे सुमारे २०० हून अधिक कृषी उत्पादनांचे स्टॉल उभारण्यात येणार आहेत. तसेच आधुनिक कृषी अवजारांचे प्रात्यक्षिक, विविध कंपन्यांचे शेतीसाठी उपयुक्त तंत्रज्ञान, सौर ऊर्जेवर चालणारी उत्पादने, शेतीतील नव्या संकल्पनांची माहिती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पाहता येणार आहे.या चार दिवसीय महोत्सवात एकदिवसीय पशुप्रदर्शन, डॉग शो, सौर ऊर्जेवरील उत्पादनांचे विशेष दालन तसेच शेतमजुरीला पर्याय ठरणाऱ्या आधुनिक अवजारांचे स्वतंत्र दालन अशी अनेक आकर्षणे असणार आहेत. उद्घाटन व समारोप सोहळ्यात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान देखील करण्यात येणार आहे.बीड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीचे संयोजक कृषीभूषण महेश बेदरे यांनी केले आहे.

### धान्य महोत्सवात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री

शहरी भागातील ग्राहकांना शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले धान्य, कडधान्य व इतर कृषी उत्पादने थेट मिळावीत या उद्देशाने कृषी प्रदर्शनात विशेष धान्य महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मध्यस्थांशिवाय शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट व्यवहार होऊन शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यास मदत होणार आहे.

### AI बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

सध्या शेती क्षेत्रात डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. या पार्श्वभूमीवर प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांना अख तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये कसा वापर करता येतो, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दाखवण्यात येणार आहेत. विशेषतः ऊस शेतीसह इतर पिकांमध्ये अख तंत्रज्ञानाचे महत्त्व आणि त्याचे फायदे याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार असून हे या प्रदर्शनाचे खास आकर्षण ठरणार आहे.

## बीड जिल्ह्यातील १७३ प्रकल्पांतून ८५१० टन मत्स्य उत्पादन

### पुणे-मुंबईसह संभाजीनगरमध्ये बीडच्या माशांना वाढती मागणी



बीड दि ११, (प्रतिनिधी) : दुष्काळासाठी ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यात यंदा चित्र काहीसे बदललेले दिसत आहे. अतिवृष्टीमुळे एका बाजूला शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असले तरी दुसऱ्या बाजूला जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायासाठी नव्या संधी निर्माण झाल्याचे चित्र समोर आले आहे. मार्च महिन्यात नेहमी कोरडे पडणारे प्रकल्प यंदा तुडुंब भरलेले असून त्यामुळे मत्स्य उत्पादनाला मोठी चालना मिळाली आहे.जिल्ह्यातील तब्बल ९ नद्या आणि १७३ प्रकल्पांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्यामुळे मत्स्य व्यवसायाला चांगले दिवस आले आहेत.

शासनाने ठेवलेले ८५१० मेट्रिक टन मत्स्य उत्पादनाचे उद्दिष्ट यंदा सहज गाठले जाईल, असा विश्वास मत्स्य विभागाकडून व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यातील गोड्या पाण्यातील मासे आता केवळ स्थानिक बाजारपेठेत मर्यादित राहिलेले नाहीत. पुणे, मुंबई आणि संभाजीनगर यांसारख्या मोठ्या महानगरांतही बीडच्या माशांना चांगली मागणी वाढताना दिसत आहे.

# मीडिया लेखनाचे कौशल्य रोजगाराची संधी उपलब्ध करून देते-डॉ.प्रकाश झंवर

बीड दि.०६ (वार्ताहर) स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड येथे हिंदी विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यान संपन्न झाले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आर्य महाविद्यालय वाशिमचे प्राचार्य डॉ.ओमप्रकाश झंवर उपस्थित होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.उत्तम साळवे ,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गंगाधर उषमवार तसेच प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते .

बातमी सविस्तर : स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड येथे दिनांक ६ मार्च २०२६ रोजी हिंदी विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले . याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आर्य महाविद्यालय वाशिमचे प्राचार्य तथा हिंदी विभाग प्रमुख डॉ.ओमप्रकाश झंवर हे उपस्थित होते . त्यांनी मीडिया लेखन




कौशल्य याविषयी आपले मनोगत व्यक्त केले . ते पुढे बोलताना म्हणाले की मीडिया लेखनाचे कौशल्य आज ही काळाची गरज आहे . खऱ्या अर्थाने ज्यांच्याकडे ही कला उपलब्ध आहे त्यांच्याकडे रोजगाराच्या संधी चालून येत आहेत. मीडिया लेखनातून फक्त रोजगारच उपलब्ध होत नसून तुमच्या व्यक्तिमत्त्वाला झळाली मिळते. समाजामध्ये तुमची एक ओळख निर्माण होते . खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या चौथ्या स्तंभामध्ये काम करण्याची तुम्हाला संधी चालून येते . गोरगरीब , वंचित, उपेक्षित, शेतकरी, कामकरी, कष्टकऱ्यांनाचा आवाज बनून तुम्ही त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडत असतात. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.उत्तम साळवे , हिंदी विभाग प्रमुख डॉ.गंगाधर उषमवार तसेच डॉ.संतोष शिंदे प्रा.पंडित शेंडगे , वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.रमेश खंडागळे, समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.नारायण शिंदे, भूगोल विभाग प्रमुख डॉ.अशोक डोके,संगणक विभाग प्रमुख डॉ.संजय काळे,डॉ.राजपाल जाधव, डॉ.सुभाष पटेकर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड नगरपालिकेत महिला दिनानिमित्त प्रथमच नगरसेविका व महिलांचा सत्कार

### सहकारी भगिनींचा गौरव करणे कर्तव्यच- विनोद मुळूक



बीड दि ११ (प्रतिनिधी) - जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बीड नगरपालिकेत ३५ वर्षात प्रथमच महिलांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रत्येक सहकारी भगिनींचा गौरव करणे हे आमचे कर्तव्यच असल्याचे प्रतिपादन उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त नगरपालिकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात महिला नगरसेविका,अधिकारी व कर्मचारी यांचा फेटा बांधून आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.या प्रसंगी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, महिला सभापती, महिला नगरसेविका तसेच कार्यालयातील महिला कर्मचारी आणि महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी मुख्याधिकारी फडसे, सहकारी नगरसेवक, सभापती तसेच पालिकेतील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या शिरपेच्यात मानाचा तुरा



बीड दि ११ (प्रतिनिधी) : येथील स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालयांमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिका ताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली रवींद्र नागरगोजे सरांनी लाठीकाठी प्रशिक्षण सुरू केले आहे.

यामध्ये विद्यार्थ्यांना विविध स्टेप्स शिकवत त्यांनी त्यांचे प्रात्यक्षिक शाळेतील विविध कार्यक्रमात आणि विद्यार्थी वार्षिकोत्सवात सादर केले. शिवजयंतीच्या निमित्ताने आयोजित शासकीय शिवजयंतीच्या कार्यक्रमात देखील उपस्थित मान्यवरांच्या व प्रेक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके करून दाखवले. या उपक्रमाची सर्व शाळा स्तरावरून योग्य अंमलबजावणीसाठी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश कुलकर्णी यांनी शासन स्तरावर पाठपुरावा केला. या पाठपुराव्या निमित्त महाराष्ट्र सरकारने महिला सशक्ति करण्यासाठी शाळेमध्ये लाठीकाठी आणि स्वसंरक्षण प्रशिक्षण सुरू करणार असल्याची घोषणा उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली असून स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या शिरपेच्यात यामुळे मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल सर्व स्तरातून संस्कार केंद्राचे कौतुक करण्यात येत आहे.

## संस्कार विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ए.एच. वाडिया वाचनालयास भेट

बीड दि ११(प्रतिनिधी)- मुलांना ग्रंथालयाची ओळख व्हावी, तसेच वाचनालयातील साहित्य मुलांना हाताळता यावे, वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची वाचनालयास भेट घडवून आणण्यासाठी व त्यांच्याकडून वाचन करून घेण्याच्या अनुषंगाने शहरातील संस्कार विद्यालयाच्या इयत्ता २ रीच्या विद्यार्थ्यांनी मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत शाळेच्या मुख्याध्यापीका श्रीमती कुलकर्णी एस.डी., यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षीका श्रीमती खवले पी.एस., पारगावकर व्ही.सी., अहिर जे. आर. यांच्यासमवेत वाचनालयास भेट दिली.



प्रथम प्रकाशन, दिल्ली यांच्याकडून खास मुलांसाठी खरेदी केलेली ग्रंथ संपदा सदरील मुलांना उपलब्ध करून देण्यात आली. वाचनालयातील ग्रंथ संपदेचा मनमुराद आनंद जवळपास एक ते दीडतास मुलांनी लुटला. यावेळी जवळपास ६०-७० मुलांनी उपस्थिती दर्शविली. यावेळी वाचनालयाचे ग्रंथपाल ग्रंथमित्र शेंडगे जी. आर. यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना वाचनालयाच्या ग्रंथसंपदेची माहिती दिली व अधिकधिक वाचन करावे असे आवाहन केले. मुलांना वाचानलयास भेट घडवून दिल्याबद्दल संस्कार विद्यालयाच्या शाळेच्या मुख्याध्यापीका श्रीमती कुलकर्णी एस.डी. यांनी वाचनालयाचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचारी वृंद ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, श्री. ठोसर के. आर, श्री. कुमार देशमुख, संतोष जगताप, रामेश्वर जाधव, रमेश जोशी, आदीनी परिश्रम घेतले.

## बीड ग्रंथोत्सव-२०२५ समन्वय समितीची बैठक संपन्न

बीड दि.११ (जिमाका): महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण - २०१० अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड आयोजित बीड ग्रंथोत्सव-२०२५ च्या समन्वय समितीची बैठक दि.११ मार्च २०२६ रोजी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड येथे सहाय्यक ग्रंथालय संचालक छत्रपती संभाजीनगर सुनिल हुसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीला शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.बीड प्रियाराणी पाटील, श्रीकृष्ण डोईफोडे प्रतिनिधी, जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बीड, सुधीर चाटे, अध्यक्ष, बीड जिल्हा ग्रंथालय संघ व संजय शा.मस्के जिल्हा ग्रंथालय अधिकारी, बीड हे उपस्थित होते. सर्वप्रथम या बैठकीतील उपस्थित सदस्यांचे श्री.संजय शा.मस्के, जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांनी ग्रंथभेट देवून स्वागत केले.

या बैठकीमध्ये ग्रंथोत्सव - २०२५ चे आयोजन व त्यामध्ये घेण्यात येणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम यावर चर्चा होवून ग्रथोत्सव-२०२५ चे आयोजन दि.२७ व २८ मार्च २०२६ रोजी र.भ.अटल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय , गेवराई येथे करण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. बैठकीच्या शेवटी बा.पा.पठाण, वरिष्ठ लिपिक यांनी उपस्थित सदस्यांचे आभार मानले.



**लवूळ ग्रामपंचायतीकडून नवीन अधिकारी यांनी भेट दिली असता सत्कार करण्यात आला. यावेळी माजलगावचे नवीन आयपीएस राहुल कुमार सोबत पीएसआय कोळी साहेब, एपीआय सोनवळकर, राऊत लळीं अंमलदार जेतेवाड व गोविंद बाबरे मिसाळ या सर्वांचा यावेळी लऊळ गावकरी मंडळी आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.**

## डॉ.सिंधुताई सपकाळ सेवारत्न पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड दि ११(प्रतिनिधी)- प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी स्त्री-शक्ति प्रतिष्ठाण बीड आणि पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह यांच्या संयुक्त विद्यमाने जागतीक महिला दिनाचे औचित्य साधुन समाजातील सर्व स्तरातील सर्व घटकातील संघर्षशील कार्य कर्तृत्ववान महिलांना अनाथाची माय डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या नावाने सेवारत्न पुस्कार देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्याला अध्यक्ष म्हणुन शिवसंग्रामच्या नेत्या डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे, प्रमुख अतिथी म्हणुन भायाळच्या सरपंच प्राचार्या सत्यभामाताई रामकृष्णजी बांगर, बीड नगर परिषद नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, जिजाऊ ब्रिगेडीयरच्या जिल्हाध्यक्षा प्रा. संगीताताई शिंदे (पवळ), वडवणी नगरपरिषद नगराध्यक्षा सौ. वंदनाताई शेषेराव जगताप, ढेकणमोहच्या सरपंच सौ. मंजुताई गाडीवान, जिजाऊ महिला सेवा सहकारी संस्था वाशी संस्थापक अध्यक्षा सौ. शोभाताई दत्तात्र्यजी घुमरे यांची उपस्थिती लाभणार असुन, या वर्षी डॉ. पल्लवी चंद्रकांत तोंडे, बैनडिक्ता फ्रांसिस वाझ, उषा जगन्नाथराव शेकडे, सविता विजयसिंह गोलेकर, बेबी सुनिल खंडागळे, राणी चंद्रकांत माने, अश्विनी ऋषीकेश घुले (सेप), सुषमा विवेक सोमवंशी, गीतांजली रंगराव लव्हाळे, ज्योती विजयकुमार गिरे, फरहिन बेगम शौकत बागवान, वैशाली चत्रभुज वाघमारे, दराडे विमल मुकुंदराव यांना मान्यवरांच्या हस्ते शाल हार स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन डॉ. सिधुताई सपकाळ सेवारत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ -०० वाजता पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह येथे साजरा होणार आहे, तरी बीड शहर आणि परिसरातील भगीनींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सौ. जयश्री विलास विधाते, सौ. रंजना गोवर्धन दराडे यांनी केले आहे.

# मुळुकवाडी-मसेवाडी शिवरस्त्याचा २५ वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे ग्रामस्थांकडून आभार



लिंबागणेश दि ११ (प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी ग्रामपंचायत हद्दीतील मुळुकवाडी ते मसेवाडी शिवरस्त्याचा प्रश्न तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित होता. भूमी अभिलेख कार्यालयात तीन वर्षांपूर्वी २१ हजार रुपये मोजणी शुल्क भरूनही प्रत्यक्ष मोजणी होत नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.

अखेर वस्तीवरील ग्रामस्थांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर तहसीलदार शेळके यांनी कठोर भूमिका घेत पोलिस बंदोबस्तात रस्त्याच्या खुणा करून देत रस्ता मोकळा करून दिला.

सरपंच रामकिसन कदम व पांडुरंग कानडे यांनी पुढाकार घेऊन रस्त्याचे काम सुरू केल्यामुळे पावसाळ्यात ग्रामस्थांना होणारी अडचण दूर झाली आहे. याबद्दल ग्रामस्थांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले आहेत. पावसाळ्यात शाळा सुरू झाल्यानंतर शाळकरी मुलांना गुडघाभर चिखलातून शाळेत जावे लागत होते. तसेच आठवडी बाजार, भाजीपाला, दूध-दुभते, खत-बियाणे आणणे तसेच दवाखान्यात जाण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत होती. तहसीलदार शेळके यांच्या सहकार्यामुळे समस्या दूर झाली या संदर्भात ढवळे यांनी नमूद केले की तीन वर्षांपूर्वी भूमी अभिलेख कार्यालयात २१ हजार रुपये मोजणीसाठी भरूनही मोजणी होत नव्हती. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला निवेदन देत तहसीलदार शेळके यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. सुरुवातीला खुणा करूनही काही ग्रामस्थ सहकार्य करत नसल्याने शेवटी पोलिस बंदोबस्तात रस्ता मोकळा करण्यात आला. तहसीलदार शेळके यांच्या ठाम भूमिकेमुळे ग्रामस्थांचा २५ वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी लागला, असे मत व्यक्त केले.

दै.पार्श्वभूमी,बीड Date- 12/03/2026

**DECLARATION**

I HAVE DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**OLD NAME - JAY RAVINDR KANADE**

**New Name : KANADE JAY RAVINDRA**

ADDRESS : DATT COLONY MAJALGAON DIST BEED. MS 431131

पार्श्वभूमी

दि.१२ मार्च २०२६ गुरुवार



## बीडमध्ये मोगरा फुलला संगीतमय कथा

बीड दि.११(प्रतिनिधी):- महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्म जयंतीनिमित्त ज्ञानियांचा राजा या उपक्रमांतर्गत मोगरा फुलला ही सांगीतमय कथा आयोजित करण्यात येत आहे.हा कार्यक्रम शुक्रवार दि. १३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत संस्कृती विद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, इशशव येथे होणार आहे.या कार्यक्रमात महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका सन्मिता शिंदे अभंग व भक्तीगीतांचे सादरीकरण करणार आहेत, तर गणेश शिंदे हे सांगीतमय कथा निरूपण करणार आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मापासून ते समाधी सोहळ्यापर्यंतचे

पान २ वर

## योगेश्वरी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी बनवले एलईडी स्क्रीन

अंबाजोगाई दि ११ (प्रतिनिधी)– योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील प्रथम वर्षात शिकणाऱ्या संगणक अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील उपलब्ध प्रयोगशाळेत प्रा.निशांत मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली एलईडी स्क्रीन ची निर्मिती केली आहे. एलईडी स्क्रीन तंत्रज्ञानाच्या जलद प्रगतीमुळे विविध

पान २ वर

### पैठण–पंढरपूर पालखी मार्गाला शहरी भागातच हद्दीचे ग्रहण

# निमुळत्या रस्त्यावरून होणार दोन मार्गाची वाहतूक; संभाव्य वाहतूक कोंडीचा प्राधिकरणाला विसर

**शिरुर कासार दि.११(प्रतिनिधी) :पैठण– पंढरपूर पालखी मार्गाचे गेल्या पाच वर्षापासून प्रगतीपथावर आहे. पैठण–पंढरपूर मार्ग व राजूरी नवगन–चिंचपूर मार्ग शिरुर कासार शहरातून जवळपास ६०० मिटर अंतरावरून एकत्रित मार्गस्थ होत आहे. शहरीभागात या मार्गाचे काम केवळ २० मिटरच्या हद्दीपर्यंत मजबुतीकरण प्रगतीपथावर आहे. जबाबदार प्रशासन व कंत्राटदार कंपनीच्या संगनमताने ठरवून नियोजीत मार्गावर कायम वाहतूक कोंडी, अपघाताला निमंत्रण दिले जात असल्याने पालखी मार्गाच्या हद्दीला शहरातच ग्रहण लागल्याच्या भावना व्यक्त केल्या जात आहेत.**



राज्यातील दोन तिर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या पैठण-पंढरपूर पालखी मार्गाचे काम गेल्या एक तपा पासून प्रगती पथावर आहे. दरवर्षी टप्प्या-टप्प्याने धिम्या गतीने सुरू असलेल्या कामाच्या कंत्राटदार कंपन्या सातत्याने बदलत आहेत. पालखी मार्गाच्या पूर्णत्वासाठी पंढरपूर पासून पैठणपर्यंत वारकरी, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते ग्रामस्थांनी सातत्याने आंदोलन, मोर्चे, रास्ता रोकोंसह अनोखे आंदोलनं करून प्रशासनाचे लक्ष वेधले. प्रत्येकवेळी आंदोलकांना जबाबदार प्रशानाला मागणी कळवण्याचे अश्वासन मिळाले. पण पदरी कायम निराशाच आली. राज्याच्या पाच जिल्ह्यातून मार्गस्थ होत असलेल्या पैठण-पंढरपूर पालखी मार्गाच्या सभोवतालच्या शहरांसह गावखेड्यातील नागरिकांना जीव मूठीत घेवून वाहतूक करावी लागते, जागोजाग खोदाई, भराव आणि सिंगल पट्ट्याच्या





काँक्रिटीकरणामुळे कित्तेक वाहन चालकांचा वाहनावरील ताबा सुटून अपघात झाले तर दुचाकीस्वारांचा अपघातामध्ये जीव गेला. अपघात झाला की, नागरिकांनी आंदोलन छेडावे, स्थानिक प्रशासनाने ठरल्याप्रमाणे 'मागण्या कळवण्याचे लेखी अश्वासनावर आंदोलनकर्त्यांची बोळवन करावी, या सूत्र ठरलेलंच' छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून आहिल्यानगर जिल्ह्यात आणि त्यानंतर बीड जिल्ह्यात प्रवेशीत होत असलेल्या पालखी मार्गाचे शिरुर कासार तालुक्यात दहिवंडी शिवारात अर्धवट आहे. शहरानजीक सिंदफणा नदीपात्रतून पूरनियंत्रण रेषेची हद्दच मार्गाने व्यापली आहे. उत्तमनगर मार्गे प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंतचा टप्पाही अर्धवट आहे.

**रस्ता हद्द ३० मिटरची :** पालखी मार्ग रस्त्याची हद्द ३० मिटर आहे. इंस्टीमेंटनूसार जेवढी हद्द असेल तेवढे काम करण्यात येत असेल. कंपनीच्या नियमप्रमाणे काम सुरू असेल त्यामुळे आमची हद्द ही ३० मिटर अथवा कितीही असली तरी जेवढे इंस्टीमेंटमध्ये आहे तेवढे काम सुरू असेल. गजानन सितलांबे (अभियंता राष्ट्रीय महामार्ग, छ. संभाजीनगर)

**पीडब्ल्यूडीकडेच सर्व माहिती :** रस्ता हद्द व मार्गाच्या कामाची माहिती सर्व माहिती सार्वजनिक बांधकाम राष्ट्रीय महामार्ग छत्रपती संभाजीनगर विभाग (पीडब्ल्यूडी) कडेच उपलब्ध आहे. –ब्रम्हय्या (प्रोजेक्ट मॅनेजर)

## अज्ञात वाहनाच्या धडकेत काळवीट जागीच ठार



लिंबागणेश दि ११ (प्रतिनिधी): बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील मुळुकवाडी शिवारात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-डी वर बुधवार दि.११ दुपारी सुमारे सव्वा दोन वाजण्याच्या सुमारास अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेत एक काळवीट गंभीर जखमी झाले.मुळुकवाडी येथील सुखदेव वाणी व ग्रामस्थांनी जखमी काळवीटाला पाणी पाजून त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला; मात्र गंभीर दुखापत झाल्याने काही वेळातच त्याचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी काळवीट

पान २ वर

## पिंपळनेरसह ग्रामीण भागात पुन्हा चुली पेटल्या



पिंपळनेर : जागतिक स्तरावर वाढत चाललेल्या युद्ध परिस्थितीचा परिणाम आता सर्वसामान्यांच्या जीवनावरही दिसू लागला आहे. इंधन दरवाढ, गॅस सिलिंडरच्या किंमतीत झालेली वाढ तसेच महिन्याला एकच सिलिंडर मिळणार असल्याच्या चर्चामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक गणिते विस्कळीत झाली आहेत. काही ठिकाणी पुन्हा चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात सध्या घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढल्याने अनेक कुटुंबांना गॅसचा वापर कमी करावा लागत आहे. त्यातच महिन्याला मर्यादित सिलिंडर मिळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. आधीच शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. विशेषतः कांद्याच्या दरात झालेली मोठी घसरण, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यामुळे घरखर्च भागविणे कठीण झाल्याने अनेक कुटुंबांनी गॅसऐवजी पुन्हा पारंपरिक चुलीचा

पान २ वर

### ऊसतोड मजुरांसाठी लाडकी बहीण

## योजनेची बंद पडलेली केवायसी साईट सुरू करा-नवनाथ धायजे



माजलगाव (प्रतिनिधी) - ऊसतोड मजूर कुटुंबांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्यात केवायसी साईट बंद असल्याने अडथळे येत आहेत.स्थलांतरित स्वरूपात काम करणाऱ्या या मजुरांना वेळेत कागदपत्रे पूर्ण करता येत नसल्याने अनेक लाभार्थी वंचित राहत आहेत.या पार्श्वभूमीवर केवायसी साईट तात्काळ सुरू करावी.तसेच ऊसतोड मजुरांसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत,अशी मागणी बहुजन विकास मोर्चाचे ज्येष्ठ नेते नवनाथ धायजे यांनी केली आहे.

ऊसतोडीच्या हंगामात बीड जिल्ह्यातून हजारो मजूर कुटुंबांसह स्थलांतर करतात.त्यामुळे आधार, मोबाईल लिंक,बँक खाते अपडेट, ओटीपी खाते केवायसी करू शकत नाहीत.त्यातच शासनाने केवायसी साईट बंद केली आहे.यामुळे लाडक्या बहिणींना शासनाच्या लाडकी बहिण योजनेचा लाभ मिळत नाही.साईट बंद असल्याने हजारो लाभार्थी वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. यामुळे गरीब कष्टकरी लाडक्या बहिणींचे आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर केवायसी साईट तात्काळ सुरू करावी,अशी ठाम मागणी धायजे यांनी केली आहे.ऊसतोड मजूर हे स्थलांतरित जीवन जगतात.कामाच्या ठिकाणी कागदपत्रे पूर्ण करणे आधीच अवघड असताना, केवायसी साईट बंद असल्याने त्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. योजना कागदावर चांगली,पण अंमलबजावणीत अडथळे असतील तर गरिबांना न्याय कसा मिळणार? असा सवाल धायजे यांनी उपस्थित केला.दरम्यान ऊसतोड मजुरांसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत. स्थलांतरित मजुरांना लक्षात घेऊन सुलभ प्रक्रिया राबवावी अन्यथा,

पान २ वर

## चकलांबा पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी एपीआय सचिन इंगळे



बीड दि.११ (प्रतिनिधी):- येथील जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांची चकलांबा पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकारीपदी नियुक्तीचे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी निर्गमित केले आहेत. चकलांबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे दिनांक ११ मार्च रोजी लाच प्रकरणात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.सचिन इंगळे

पान २ वर

## डोंगरकिन्ही येथे उद्या होणार नर्मदा परिक्रमा केलेल्या संतांची मिरवणूक व दर्शन सोहळा

डोंगरकिन्ही (प्रतिनिधी):-महान संत दादागुरु महाराज यांची नुकतीच ३६०० कि.मी व सलग १२७ दिवस पायी माँ नर्मदा परिक्रमा संपन्न झाली. या परीक्रमामध्ये पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्हीचे वैभव असलेले श्री स्वामी हरिहरानंद सरस्वती महाराज यांनी सहभाग घेत कठोर पायी प्रवास करत परीक्रमा पूर्ण केली. त्यांचे डोंगरकिन्ही येथे दि.१३ मार्च वार शुक्रवार रोजी आगमन होणार आहे.यानिमित्त ग्रामस्थ पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने भव्य स्वागत व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने मा.सरपंच आप्पासाहेब येवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

नर्मदा परिक्रमा ही अत्यंत पवित्र आणि कठीण यात्रा मानली जाते. संत , महात्मे , भाविक नर्मदा नदीच्या किनाऱ्याने सुमारे ३६०० किलोमीटरची पदयात्रा करत आत्मिक साधना, श्रद्धा आणि धैर्याची अनुभूती घेतात. अशा या महा परीक्षा मध्ये डोंगरकिन्ही येथील श्री स्वामी हरिहरानंद सरस्वती महाराज व त्यांच्या समवेत परीसरातील ह भ प लक्ष्मण सस्ते महाराज पाटोदा, ह भ प नारायण महाराज डिसले, तसेच ह भ प शिवाजी महाराज गुजर, सातपुते महाराज हे सर्व जन नर्मदा परिक्रमेत संत दादागुरु महाराज यांच्या समवेत सहभागी होऊन पदयात्रा यशस्वी पूर्ण केली आहे.

पान २ वर

## राज्यात हुंडाबळींचे सत्र सुरूच; अर्थसंकल्पीय अधिवेशनात गंभीर आकडेवारीने महाराष्ट्र हादरला



अंबाजोगाई दि ११ ( प्रतिनिधी)-एकिकडे आपण प्रगतीच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे हुंड्यासारख्या अघोरी प्रथेमुळे आजही महिलांचे बळी जात आहेत, ही महाराष्ट्रासाठी शरमेची बाब आहे, अशा तीव्र भावना व्यक्त करत आ. नमिता मुंदडा यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पी अधिवेशनात त्यांनी मांडलेली परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे.देशातील आणि राज्यातील भयावह वास्तव सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, हुंडाबंदी कायदा असूनही गुन्ह्यांचे प्रमाण कमी होताना दिसत नाही: देशपातळीवर (२०२३): हुंडाबंदी कायद्यांतर्गत १५,००० पेक्षा अधिक गुन्हे

### आ.नमिता मुंदडा सभागृहात आक्रमक

हुंडाबळीच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (छछठइ) आणि राज्याच्या ताज्या आकडेवारीचा हवाला देत नोंदवले गेले, तर ६,००० पेक्षा जास्त महिलांना हुंड्यासाठी जीव गमवावा लागला. देशाची आर्थिक

पान २ वर

### अधिवेशनात अभ्यासपूर्ण मुद्दा मांडत शासनाला निर्णयाची मागणी

## दुधाचा मोबदला थेट माय-माऊलींच्या खात्यात द्या-आ.धस



पाटोदा दि.११(महेश बेदरे):- राज्यातील दूध उत्पादन क्षेत्रात महिलांचे श्रम मोठ्या प्रमाणावर असतानाही त्यांना प्रत्यक्ष आर्थिक लाभ मिळत नसल्याची वस्तुस्थिती अधोरेखित करत दूध उत्पादनातून मिळणारा मोबदला थेट माय-माऊलींच्या हातात द्या अशी ठोस आणि अभ्यासपूर्ण मागणी आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. त्यांच्या या वेगळ्या विषयामुळे सभागृहाचे विशेष लक्ष वेधले गेले. अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना धस यांनी सांगितले की, दूध उत्पादनाच्या क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेसर असला तरी प्रत्यक्षात या व्यवसायातील कष्टाचा मोठा वाटा महिलांचा असतो. गाई-म्हशींना चारा घालणे, गोठ्याची स्वच्छता करणे, शेण काढणे, जनावरांची देखभाल आणि दुध काढणे अशी सर्व मेहनतीची कामे ग्रामीण भागातील महिला दिवसभर करत असतात. मात्र एवढे श्रम करूनही दूध विक्रीतून मिळणारा मोबदला अनेकदा महिलांच्या हातात येत नाही. घरातील आर्थिक व्यवहार पुरुषांकडेच केंद्रीत असल्याने महिलांच्या श्रमांचे योग्य मूल्य त्यांना मिळत नसल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे दूध संकलन संस्थांकडून दिला जाणारा मोबदला थेट महिला दूध उत्पादकांच्या नावावर जमा करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

धस यांनी पुढे नमूद केले की,

पान २ वर

## महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना बीडच्या वतीने उद्या जिल्हास्तरीय मेळावा

बीड दि.११(प्रतिनिधी )- महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त कर्मचारी व अधिकारी संघटना जिल्हा शाखा बीड यांच्या वतीने दिनांक १३ मार्च शुक्रवारी बीड येथे जिल्हास्तरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.निवृत्तीवेतनधारकांचे वर्तमान प्रश्न , शासन प्रशासनासोबत झालेल्या बैठकीचे अहवाल वाचन, आठव्या वेतन आयोगाच्या शिफ़ारसी च्या आनुषंगाने शंका व भिति, संघटनात्मक बांधणी ,तसेच जागतिक महिला दिनाच्या अनुषंगाने निवृत्त कृतिशील महिला यांचा गौरव याप्रसंगी करण्यात येणार आहे, तसेच बीड जिल्हा परिषद अंतर्गत २०२४ ते २०२६ पर्यंत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती विषयक लाभ याबाबत सविस्तर चर्चा व त्या बाबत पुढाकार घेऊन लाभ मिलवन्यबाबत प्रयत्न करण्यात येणार आहे

पान २ वर

## अमृताश्रम स्वामी महाराज यांना राज्यस्तरीय वारकरी भूषण पुरस्कार प्रदान

बीड दि.११(प्रतिनिधी):- श्री क्षेत्र पैठण येथे पंचपर्वश्रेणी व नाथ षष्ठी उत्सवा मध्ये प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी संत एकनाथ मिशन व नाथ वंशज योगीराज महाराज गोसावी यांच्या कडून १० मार्च २०२६ रोजी श्री गुरु चैतन्य महाराज देगलूरकर, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, प्रकाश महाराज जवंजाळ यांच्या हस्ते नाथ शिष्य दंडवत स्वामी यांची परंपरा चालविणाऱ्या धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज यांना राज्यस्तरीय वारकरी भूषण पुरस्कार नाथसंस्थानाधिपती भैय्यासाहेब महाराज यांच्या नावे प्रदान करण्यात आला. या प्रसंगी प्रमोद महाराज जगताप यांना प्रबोध मार्तंड , संजय महाराज पाचपोर यांना भानुदास एकनाथ , स्वर मार्तंड रघुनाथजी खंडाळकर व ताल मार्तंड पांडुरंग पवार आणि व सेवा

पान २ वर

## पदोन्नती कृती समितीचे जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण



बीड दि.११(प्रतिनिधी):-शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, ग्रेड मुख्याध्यापक (प्रा.) पदोन्नती तात्काळ देण्यात यावी, या मागणीसाठी पदोन्नती कृती समितीच्या वतीने बीड जिल्हा परिषदेसमोर बुधवारी साखळी उपोषण सुरू केले आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या

पान २ वर

CMYK